मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

...हित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

शं. दा. पेंडसे

कृ. मो. शेंबवणेकर

वा. वि. मिराशी

श्री. मा. कुळकर्णी

मा. गो. देशमुख

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

...र्ष ९ फेब्रुवारी १९५९

...क ११ किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

दादासाहेब खापर्डे त्यांच्या बरोबर होते आणि वऱ्हाडच्या दौऱ्यांत बाबासाहेब खापर्डे त्यांच्या बरोबर होते. तेव्हापासून कांही वर्षांपूर्वीपर्यंत बाबासाहेब राजकारणांत होते. मध्यप्रांताच्या विधिमंडळांत ते तीनदा निवडून आले. तेथे राष्ट्रीय पक्षाचे ते पुढारी होते. आणि नंतर शिक्षणमंत्री होऊन ते राजकारणांतून निवृत्त झाले. त्यांनी फक्त टोपी बदलली असती तर ते आज प्रांताचे मुख्यमंत्रीहि झाले असते. पण त्यांची राजकीय तत्त्वनिष्ठा इतकी खंबीर व प्रामाणिक आहे की मंत्रिपदाचा लोभ त्यांना भुलवूं शकला नाही आणि हिंदुहितविरोधी अशा राजकीय धोरणाला त्यांनी घीहि पाठिंबा दिला नाही. त्यांच्या व्यक्तित्वांतील त्त्वनिष्ठतेचा हा पैलू अत्यंत तेजस्वी आहे.

विद्यार्थिदशेच्या दीर्घ काळांत परीक्षेव्यतिरिक्त घेत्र वाचन बाबासाहेबांनी केलें. त्यांच्या वडिलांप्रमाणेच तेहि इंग्रजी, संस्कृत, फारसी, मराठी इत्यादि ...त प्रवीण आहेत आणि या भाषांतील उत्कृष्ट वाङ्मय त्यांनी वाचलें आहे. थिऑसफिस्ट असल्यामुळे तत्त्वज्ञान हा त्यांच्या आवडीचा विषय आहे. या विषयावरील इंग्रजी, संस्कृत व मराठी भाषांतील ग्रंथ त्यांनी काळजीपूर्वक अभ्यासिले आहेत. वकिलीचा व्यवसाय आणि राजकारणाची उलाढाल चालू असतांहि त्यांच्या आवडीच्या विषयांवरील वाचन कधीच खंडित झालें नाही. भारतीय वेदान्ताचा त्यांनी अभ्यास केला. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, भौतिक शास्त्राव...चे अनेक ग्रंथ वाचून त्यांतील अद्ययावत् शोधांचा व सिद्धान्तांचा त्यांनी परिचय करून घेतला. आइन्स्टिनचा कठीण व सूक्ष्म सिद्धान्तहि त्यांनी आत्मसात् केलेला असून भौतिक शास्त्रांतील नवीन शोधांनी वेदान्ताचे सिद्धान्तच बळकट कसे होत आहेत हें दाखविणारा ग्रंथ सध्या ते लिहीत आहेत. त्यांचा व्यासंग ग्रंथनिविष्ट करण्यास यापूर्वी त्यांना वेळ मिळाला नव्हता. त्यांनी जर आत्मचरित्र लिहिलें तर मराठी भाषेत एका सुंदर ग्रंथाची भर पडेल. त्यांचे अभ्यासपूर्ण अनेक लेख 'सह्याद्रि'सारख्या मासिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. पण आता त्यांच्या हातून ग्रंथरचना व्हावी असा योग दिसतो. मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेतर्फे त्यांनी दिलेल्या साहित्यविषयक व्याख्यानांचेंहि पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल. बाबासाहेबांचा व्यासंग आणि विद्वत्ता लक्षांत घेऊनच शासन साहित्य प...देने सन्मानपूर्वक त्यांना व्याख्यानें देण्याकरितां ...वले हें अगदी उचित झालें. कारण विद्वत्ता आणि वक्तृत्व या दोन्ही गोष्टी बाबासाहेबांच्या ठिकाणीं एकत्र झाल्या आहेत. त्यांचें वक्तृत्व म्हणजे केवळ शब्दांची आतषबाजी नसते. त्यांत विचार असतात पण ते व्यक्त करण्याची बाबासाहेबांची शैली इतकी मनोवेधक आहे की श्रोत्यांना ते विचार ग्रहण करण्यास कष्ट तर पडत नाहीत, उलट भाषणाच्या ओघांत येणाऱ्या विनोदाने प्रसन्नचित्त होऊन श्रोते ते विचार सुलभतेने ग्रहण करतात. त्यांनी आतापर्यंत दिलेल्या भाषणांचे अध्यात्म, साहित्य, राजकारण इत्यादि विषयांनुरूप अनेक खंड प्रसिद्ध करतां आले असते. पण हीं भाषणें लेखनिविष्ट नव्हतीं; कारण भाषण आधी लिहून काढून तें वाचणें बाबासाहेबांना आवडत नाही. त्यांचें भाषण ऐकतांना त्यांचे वडील दादासाहेब यांची आठवण होते असें गेल्या टिळक-पुण्यतिथीच्या प्रसंगीं मध्यप्रांताचे राज्यपाल डॉ. पट्टाभि सीतारामय्या म्हणाले तें अगदी खरें आहे.

आरंभीं उद्धृत केलेल्या श्लोकाप्रमाणे पूर्वपुण्याईने प्राप्त होणाऱ्या तेरा गुणांपैकी बहुतेक गुण बाबासाहेबांना लाभले आहेत. आज त्यांचें वय ७४ वर्षांचें अ... आणि तरीहि त्यांचें तत्त्वचिंतन, वाचन व ले... अखंड चालू आहे. आपल्या मनाशीं व मतांशीं ...णिक राहिल्यामुळे येणाऱ्या विपत्तीहि, "विपत्तौच महतां एकरूपता" या सुभाषितां... प्रमाणे शांतपणें सहन करण्याचें सामर्थ्य त्यांच्यातहि आहे. त्यांचा हा गुणसन्... च विदर्भ साहित्य संघा... आलें आहे. त्यां... आणि विद्व... करून ... दुसरें न ... तिक्रियात्मक ... ली आहे.

...ks ...are plot finds it the whole ...ontrivance, he is ...forr... us of this person's ...that end is forced the expedient of better way being

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गडकऱ्यांच्या नाटकांतील 'स्वगत'

(विदर्भ साहित्य संघ गडकरी-स्मारक समितीच्या विद्यमाने,
गडकरी-स्मृतिदिनानिमित्त दि. २४ जानेवारी १९५५ रोजीं झालेलें
प्रा. श्री. मा. कुळकर्णी ह्यांचें भाषण)

गडकऱ्यांच्या नाटकांतील 'स्वगता'ची चर्चा करण्यापूर्वी एकंदरीनेच या प्रकारासंबंधी थोडेसें विवेचन मी करणार आहें. 'स्वगत' हा प्रकार हल्लीच्या नाटकांत आपणांला मुळीच दिसत नाही. 'कृत्रिम' म्हणून त्याची केव्हाच हकालपट्टी करण्यांत आली आहे. फिरून तो प्रकार नाटकांत सुरू करावा किंवा नाही हा स्वतंत्र प्रश्न आहे. परंतु या स्वगताची भूमिका नीटपणें समजावून घेणें मात्र अगत्याचें व न्यायाचें आहे.

इतर पुष्कळ कृत्रिमतेचे प्रकार नाटकांत चालू असतांना 'स्वगता'लाच तेवढें त्याज्य ठरविणें गैर आहे असें म्हणून श्री. फडके यांनी आपल्या 'प्रतिभा-पाधनां'त त्याचे कांही ग्राह्य व कांही अग्राह्य असे
ारहि दिले आहेत. व एकापरीने कांही मर्यादेपर्यंत
ाचें त्यांनी समर्थनहि केलें आहे. मात्र तें सगळें,
ा कृत्रिम मानूनच त्यांनी केलें आहे. पण
ा प्रकार खरोखरीच कृत्रिम आहे कां ?

वर आपण कृत्रिमतेचा आरोप कां करतों ?
ाने कोणीहि बोलत नाही व असें
ाचें ठरतें म्हणून. तसें पाहिलें
...सें स्वतःशींच काढतांना
ार केला तरी
ातितः भिन्न
माण

गताची गणना कृत्रिमांतच करावी लागेल. म्हणूनच श्री. फडके यांनी ह्याला कृत्रिम मानूनच ह्याचें समर्थन केलें आहे.

परंतु तत्त्वतः 'स्वगत' म्हणजे पात्राच्या मनांतील विचार असें मानलें पाहिजे. श्री. गडकरी असेंच मानीत असत असें म्हणायला त्यांच्या नाटकांत आधार आहे. पुण्यप्रभावांतील पहिल्याच अंकाच्या पहिल्याच प्रवेशांत अगदी सुरवातीलाच ईश्वरचें जें 'स्वगत' आहे त्याच्या शेवटीं, 'पण या विचारांना आता आवरून धरलें पाहिजे' असें वाक्य आहे. एकच प्याला नाटकांत (अंक ४ प्रवेश ३, पृ. ७३) सुधाकराच्या स्वगतांत असेंच वाक्य आहे. 'जाऊं देत ! यांच्याबद्दल विचार करण्याइतकी सुद्धा...' वगैरे. तसेंच भाववंधनांतील हें उदाहरण पहा. तिसऱ्या अंकाचा पहिला प्रवेश म्हणजे घनश्यामचें लांब 'स्वगत' आहे. त्यांत हें वाक्य आहे. 'वाः काय भलत्या कल्पनांचें काहूर उत्पन्न झालें.' तेव्हा स्वगत म्हणजे पात्रांच्या मनांतील विचार अथवा कल्पना. उघड असें स्वतःशींच केलेलें भाषण नव्हे. पात्रांच्या मनांतील या हालचाली वाचक-प्रेक्षकांना ज्या कळतात त्या कोणत्या तरी अलौकिक शक्तीमुळें. ही भूमिका केवळ स्वगताच्याच बाबतींत नव्हे तर एकंदर नाटकाच्याच बाबतींत स्वीकारणें प्राप्त असतें. कसें तें पहा.

नाटकांतील कोणत्याहि दोन पात्रांचा संवाद जरी घेतला तरी तो तीं पात्रें प्रेक्षकांच्या समोर का

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

…न करतील? नायक-नायिकांचे प्रेमाचे प्रसंग, …त्रीं संभाषणें, इतकेंच नव्हे तर आलिंगनेंसुद्धा …कांत असतात. हे सारे प्रसंग हजारों लोकांदेखत …ी सूज्ञ मनुष्य करील काय? गडकऱ्यांचा वृंदावन …ेखील एके ठिकाणीं म्हणतोच ना की 'रहस्या-…न जग कसें चालेल? आपला आताचाच प्रणयसंवाद …ांनी ऐकिलेला तुला आवडेल कां?' —अंक १ …श २–पृ. ३४. पण हा संवाद वस्तुत: प्रेक्षक ऐकतात. … या प्रकाराला कोणी कृत्रिम म्हणत नाही. याचें …रणाच माझ्या मतें हें आहे की, तीं पात्रें प्रेक्षक निरपेक्ष …रत असतात. आणि जणू कोणत्या तरी अलौकिक …ीमुळे प्रेक्षकांना तें सर्व ऐकायला व पहायला मिळतें. …लौकिक शक्तीची कल्पना केल्याशिवाय प्रत्येक … प्रेक्षक उपस्थित कसे राहतात याचें समर्पक व … उत्तरच देतां येणार नाही. सौभद्र नाटकांत … श्रीकृष्णाच्या मंदिरांतील प्रसंग प्रेक्षकांना … तर क्षणांत अरण्यांत सुभद्रा मूर्च्छित पडली …ी असा देखावा दिसतो. मग त्यावेळीं सुभद्रेवरोबरच प्रेक्षकांनाहि घटोत्कचानें उचलून नेलें अशी कल्पना …णार काय? किंवा शारदा नाटकांतील पहिल्या …ांत संगमपूरच्या संगमनाथाच्या देवळांतील प्रसंग …णारे प्रेक्षक अंकांत गंगापुरांतील हेरंबमहालांतलीं … पाहतात तें काय भद्रेश्वरानें त्यांनाहि आपल्या-…वर तिकिटं काढून नेलेलं असतं म्हणून? मग? … काय समजावयाचें? हेंच की, प्रेक्षकांचा आणि …त्रांचा व कथानकाचा तादृश कांहीहि संबंध नाही …णि प्रेक्षकांना कांही अलौकिक शक्तीच्या द्वारें हे सगळें …ंग पहावयाला मिळतात. नाटक हें व्यक्तीसाठी नसून …ींसाठी आहे या सूत्राचा वरील विवेचनाशीं विरोध …ही. मी 'पात्रांचे व प्रेक्षकांचे संबंध' याची तात्त्विक …र्चा करीत आहे, नाटककार व प्रेक्षक यांच्या संबंधाची …ही. दुसऱ्या रीतीनें असें म्हणतां येईल की, नाटककार …टकाची मांडणी जरी प्रेक्षकां… करीत असला …ो त्या नाटकांतील पात्रांचा …ांचा प्रत्यक्ष …ंध नसतो. तीं पात्रें आपलें ज… …ल्या परीने …त असतात. नाटककार आ… शक्तीच्या …ाय्याने तें जीवन प्रेक्षकांना दाखवी… तो, मात्र

गुप्त रूपानें. त्या पात्रांना वाचक-प्रेक्षकांची चाहूल मुळीच लागत नाही. याच अर्थानें पात्रांचा व प्रेक्षकांचा संबंध नसतो, असें मी म्हटलें. आणि म्हणूनच पात्राचें 'स्वगत' प्रेक्षकांना ऐकूं गेलें म्हणून जर त्याला कृत्रिम म्हणायचें असेल (एका पात्राचें स्वगत दुसऱ्या पात्राला ऐकूं जात नाही असें तर गृहीत धरलेलेंच असतें) तर नाटकांतील एकूण एक व्यवहारहि त्याच कारणासाठी कृत्रिम ठरवावा लागेल. तात्पर्य, स्वगताच्या बाबतींत निराळा न्याय लागूं करतां येणार नाही. पुन्हा एका पात्राचें स्वगत दुसऱ्या पात्राला ऐकूं जात नाही याचाच अर्थ असा होतो की तें दुसऱ्याला ऐकूं जाईल अशा रीतीनें म्हणजेच मोठ्यानें केलेलें भाषण नव्हे. यांतच 'स्वगता'चें खरें स्वरूप स्पष्ट झालें आहे. तें उघड भाषण नसून 'मनोगत' आहे. हें मनोगत इतर व्यवहार कळतात तसेंच कळतें तें अलौकिक शक्तीमुळे. या शक्तीचें दृश्य रूप पात्रानें मोठ्यानें बोलणें असें आहे त्याला मात्र इलाज नाही. William Congreve या नाटककारानें आपल्या 'The Double-Dealer' या नाटकाच्या प्रास्ताविकांत फार सुंदर रीतीनें पण थोडक्यांत असाच विचार मांडला आहे. तो म्हणतो, "Not only in this case (म्हणजे स्वगताच्या बाबतींत) but in any part of a play, if there is expressed any knowledge of an audience, it is insufferable. But otherwise, when a man in soliloquy reasons with himself...we ought not to imagine that this man either talks to us or to himself......But we are concealed spectators of the plot in agitation, and the poet finds it necessary to let us know the whole mystery of his contrivance, he is willing to inform us of this person's thoughts, a… that end is forced to ma… … the expedient of … better way being

yet invented for the communication of thought."

—*Epistle Dedicatory to the 'Double Dealer'*

'स्वगता'संबंधीची ही भूमिका आता स्पष्ट झाली असेल असें मी समजतों. कादंबरींत मनोविश्लेषणाचा जो प्रकार त्याच्याशीं समांतर असा हा स्वगताचा प्रकार नाटकांत आहे. असो.

स्वगताची ही भूमिका स्वीकारल्यानंतर स्वगताच्या ग्राह्याग्राह्यतेच्या कसोटयाहि निराळया ठरतात. या कसोटया मुख्यत: तीन मानतां येतील. पहिली कसोटी आवश्यकतेची, दुसरी स्वाभाविकतेची. कुठल्याहि स्वगताचा विचार करतांना प्रथम हें पहायला पाहिजे की ह्या स्वगताची तेथे आवश्यकता आहे काय? म्हणजेच एखाद्या पात्राच्या मनांतील भाव, विचार, विकार, कल्पना इ० प्रेक्षकांना कळविणें कोणत्या तरी कारणासाठी इष्ट अथवा आवश्यक आहे काय? हेंहि पहायला पाहिजे की, तें काम उघड भाषणाने साधण्यासारखें नाही काय? दुसरी कसोटी दुहेरी आहे. स्वगतांतून मनांतील जे विचार-विकार वगैरे व्यक्त होतात ते त्या त्या प्रसंगीं निर्माण होणें स्वाभाविक आहे की नाही हें पाहणें हा एक भाग. आणि ते विचार-विकार व्यक्त होतील अशी साधी वाक्यरचना त्या स्वगताची आहे की नाही हें पाहणें हा दुसरा भाग. तिसरी जी उपयुक्ततेची कसोटी तिचेंहि थोडेंसें स्पष्टीकरण करायला पाहिजे. स्वगताचे अनेक उपयोग असूं शकतात. फडक्यांनी प्रतिभासाधनांत असे कांही उपयोग दाखविले आहेत. त्याखेरीजहि रंगभूमीची उणीव भरून काढणें, सामान्य प्रेक्षकांना विशिष्ट प्रसंग नीट समजण्याला मदत करणें, प्रेक्षकांना जो भाग दृश्य नाही तो श्रवण-द्वारा कळविणें इ० उपयोगहि स्वगताचे असूं शकतात. तेव्हा यांपैकी कुठलाहि एखाद्या उपयोग स्वगताचा असेल तर तें अगदीच त्याज्य मानता येणार नाही. अर्थात् वरील तिन्ही कसोटया एकाच वेळीं लागू करायच्या आहेत. मात्र प्रत्येक 'स्वगत' [illegible] कसोटयांना उतरेलच असें नाही. तारतम्य [illegible] केलें पाहिजे.

आता गडकऱ्यांच्या नाटकांतील 'स्वगतां'कडे वळायला हरकत नाही. विवेचनाच्या सोयीसाठी गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगताचे दीर्घ व लहान असे दोन भाग मी केले आहेत आणि त्यांचा क्रमश: विचार यापुढे केला आहे.

गडकऱ्यांच्या चार पूर्ण नाटकांत मिळून १० ओळींच्या वर असलेलीं दीर्घ 'स्वगतें' एकूण ६६ आहेत. प्रेमसंन्यासांत १९, पुण्यप्रभावांत १८, एकच प्यालयांत ७ आणि भावबंधनांत सर्वांत अधिक म्हणजे २२ असा हिशेब आहे. ही आकडेवारी मी मुद्दामच आणखी थोडी लांबवितों. खाली एक तक्ताच देतों म्हणजे सोयी होईल.

प्रेमसंन्यास

कमलाकर-८	जयंत-२
विद्याधर-३	लीला-२
गोकुळ-३	बाबासाहेब-१

पुण्यप्रभाव

वृंदावन-६	भूपाल-१
कालिंदी-४	कंकण-१
ईश्वर-२	नूपुर-१
वसुंधरा-१	सुदाम-१
	दामिनी-१

एकच प्याला

सुधाकर-४	रामलाल-१
सिंधु-१	भगीरथ-१

भावबंधन

लतिका-५	मनोहर-२
घनेश्वर-४	घनश्याम-२
महेश्वर-४	इंदु-१
मालती-३	बिंदु-१

या तक्त्यावरून एकदोन गोष्टी चटकन् आपल्या लक्षांत येतात. घनश्यामचा अपवाद सोडल्यास सर्वांत जास्त दीर्घ स्वगत भाषणें खलपुरुषांच्या तोंडीं आहेत (एकच प्यालयांत खलपुरुष नाही.) आणि एकंदरीनें पाहतां या ६६ भाषणांतील ५३ भाषणें नाटकांतील महत्त्वाच्या पात्रांच्या तोंडीं आहेत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. 'स्वगत' कादंबरींतील मनोविश्लेषणाशीं समांतर असा का.र. त्याचा उपयोग मुख्यत: पात्रांच्या स्वभाव-दर्शनाकडे होतो. नाटकांत तरी या मनोविश्लेषणाचा उपयोग कथारचनेकडेहि पुष्कळ करून घेतलेला असतो. पात्रांतील भाव-भावना, विचार-विकार, क्रिया-प्रतिक्रिया, योजना व बेत या सगळ्या गोष्टी स्वगतांतून कळत असल्यामुळे या स्वगताचा अवलंब करून या पात्रांच्या मनाचें दर्शन घडवायचें तीं नाटकांत महत्त्वाचें असणें आवश्यक आहे. कारण त्यांच्याच ...िक क्रिया-प्रतिक्रिया पाहण्याची वाचक-प्रेक्ष-... उत्कंठा असते व त्यांच्याच प्रत्यक्ष क्रिया-प्रति-... निर्माण झालेल्या प्रसंगांनी कथानक बनत ... त्या क्रिया-प्रतिक्रियांमागचे हेतु समजावून ... आपणाला जिज्ञासा असते. शिवाय क्रिया-... सहेतुकतेला व त्यांच्यांतील कार्यकारण-... कथानकाच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. या गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे स्वगताचा नाटकांत केवढा उपयोग आहे हें लक्षांत येईल. गडकऱ्यांनी आपल्या नाटकांतील हीं दीर्घ स्वगतें महत्त्वाच्या पात्रांच्या बाबतींतच उपयोजिलीं हें योग्यच झालें. पण आपणाला एवढ्यावरच थांबून चालायचें नाही. त्याच्यापुढे जाऊन या स्वगतांतून ज्या मानसिक हाल-चाली त्यांनी वर्णिल्या आहेत त्यांचा स्वभावदर्शनाला कथारचनेला कितपत उपयोग झाला आहे हें पाहिलें पाहिजे.

उदाहरणासाठी प्रथम कमलाकर व वृंदावन या दोन खलपुरुषांना घेऊं. जयंत हा कमलाकराचा लहानपणासूनचा प्रतिस्पर्धी, अनेक वेळीं त्याच्या गोड वागण्यामुळे कमलाकराचा अपमान व पराभव होत गेला आणि म्हणून तो त्याचा सूड घेणार ही कमला-कराच्या सूडाच्या मागची भूमिका, त्याच्या तोंडी असलेल्या दीर्घ स्वगतांतूनच स्पष्ट झाली आहे. हा सूड तो कोणकोणत्या रीतीने घेणार हेंहि पहिल्या अंकाच्या शेवटीं आलेल्या त्याच्या स्वगतांतूनच स्पष्ट झालें आहे. पुढे द्रुमनच्या प्रेताचा उपयोग जयंताला फसविण्यासाठी कसा करायचा इ० बेतहि त्याच्या स्वगतांतूनच कळतात. यांचा कथारचनेला चांगला उपयोग झाला आहे. पण एवढेंच नाही तर कमला-कराच्या दुष्टतेचें स्वरूप कसें भयंकर होतें हेंहि त्याच्या स्वगतांतूनच चांगलें कळून येतें. पांचव्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांत जयंत फाशीं गेला अशा समजुतीनें हताश होऊन लीला एकटीच बसलेली आहे. तोंच जयंत सुटल्यामुळे खवळून गेलेला कमलाकर तिथे येतो. त्या वेळेचें त्याचें 'स्वगत' पाहण्यासारखें आहे. सूड-द्वेष, क्रोध, भय, इ० भावनांनी त्याच्या मनाचा कसा भडका उडाला होता तें या स्वगतांत कळतें. त्याचे विचार पहा. 'ज्याच्या डोळ्याला चंद्रिकेचा प्रकाश पाहवत नाही, टवटवीत फुलें पाहवत नाहीत, ज्याला कोणाच्याहि सुखाची कल्पना सहन होत नाही त्यानें स्वत:च्या भयाण निराशेवर उभारलेलें आपल्या लहान-पणापासूनच्या वैऱ्याचें सुख कसें पहावें ?' काय हें दुष्ट अंत:करण ! तो पुढे म्हणतो, 'मी केवळ प्राणाच्या भयानें पळालों नाही तर अजून जयंताचा सूड घेण्यासाठी पळतों आहे हा सूड घेतला नाही तर मेल्यावरहि माझा प्राण जाणार नाही.' एवढे विचार त्याच्या मनांत येतात तोंच त्याला समोर लीला दिसते. एकदम त्याच्या मनांत विचार येतो—'काय लीला ? ही इथे एकटी कशी ? करूं हिला अशीच ठार ? म्हणजे झालें जयंताच्या सुखाचें मातेरें ! मग मी फाशीं गेलों तरी बेहेत्तर ! बस्स हाच बेत ठरला ! घरांतलीं माणसें अजून आपल्या आनंदांत मग्न आहेत तोंच हें फूल चिरडून टाकावें.' (पृष्ठ १८०) कमलाकराच्या मनाची रचना या स्वगतांतून पुरेपूर कळून येते. या स्वगताची योजनाहि आवश्यक व स्वाभाविकच आहे. त्याच्या मनांत त्या प्रसंगीं असें काहूर माजणें हें योग्यच होतें. तें व्यक्तहि केलें आहे चांगल्या रीतीने. पण त्याचा विचार पुढे तूर्त एवढें लक्षांत घेतलें असतां पुरें की, कमलाकराच्या तोंडीं आलेल्या या ५-६ दीर्घ स्वगतां-तून त्याच्या मनोरचनेचा ...चय पूर्णपणें होतो. शिवाय त्याचे बेत वगैरे कळून कथानक समजण्यालाहि मदत होते.

...न तर्सच पुढी... एकरंगी दुष्ट आहे. पुण्य-... ...ली आहे. ...कार याहून निराळा आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तो वसुंधरा व भूपाल यांचा सूड कां व कोणत्या रीतीनें घेऊं पाहत होता तें असेंच त्याच्या स्वगतांतूनच कळतें. त्याच्या मनाची एक विशिष्ट ठेवण होती. तीहि स्वगतांतूनच कळते हें महत्वाचें आहे. ती लक्षांत आल्यामुळेच तो कमलाकरापेक्षा निराळा वाटतो. तो एकरंगी दुष्ट नाही. त्याच्या मनोरचनेंत सुष्टतेचाहि भाग आहे. तो त्याच्या मनांतील सूक्ष्म हालचालीं-वरून, विचारांच्या उलटसुलट आंदोलनांवरून कळून येतो. हें सारें स्वगताच्या द्वारा साध्य झालें आहे. पहिल्या अंकांतील दुसऱ्या प्रवेशांत कालिंदी व वृंदा-वनाचा जो एकान्त आहे, त्यांत वृंदावनाच्या तोंडीं दोन दीर्घ स्वगतें आहेत. त्यांतलीं हीं कांही वाक्यें पहा. 'एकदा वाटतें, सूडाच्या कल्पना सोडून, मनाची अडी मोडून मनमोकळेपणानें हिला सर्व सांगून टाकावें......हे कोमल मना, तसें करायला कोणती हरकत आहे ? ही सुखाची सृष्टि सोडून सूडाच्या वणव्यांत होरपळत पडण्यांत काय अर्थ आहे ?' पृ. ३१. पण पुढे त्याचे विचार निराळ्या दिशेने चालतात. पुढच्याच स्वगतांतील या ओळी पहा. 'घटकेच्या गोड बोलण्याने माझें मन नादान होऊन मी उभ्या आयु-ष्याच्या एकाच इच्छेला झुगारून देत होतों ! हा प्रसंग आवरता घेतला पाहिजे.' त्याच प्रवेशांत पुढे कंकण जेव्हा त्याला सांगतो की 'कालिंदीची निष्ठाहि जरा चळली आहे' तेव्हा कंकण गेल्यावर वृंदावनाचा विचार पुन्हा हेलकावे खातांना दिसतो. येथील स्वगतांत गडकऱ्यांनी मनांतील फारच सूक्ष्म विचार व्यक्त केला आहे. 'कालिंदीबद्दल भलतेच शब्द ऐकल्या-बरोबर माझ्या मनाला इतका धक्का कां बरें बसावा ?' असा त्याला प्रश्न पडतो, आणि तिच्याविषयी आपल्या मनांत प्रेम असलें पाहिजे असें तो अनुमानितो. विचार करतांना मध्यंतरींच 'कंकण पापी' असा विचार त्याच्या मनांत येतो. आणि लगेच त्याला वाटतें, 'कंकण पापी—नुसत्या मूर्ख कल्पनांमुळे तो पापी—आणि मग मी कोण ?' पण हाहि विचार तो पुढे झटकून टाकतो व सूडाचा विचार कायम करतो. [illegible] राव: [illegible] त्याच्या मनांतील हीं उलट आंदोलनें सुलट [illegible] गे एकजात दुष्ट नाही हें कळून येतें. या [illegible] महत्वा [illegible] तेंच

सांगतात. "ज्याला दुष्ट व्हायचें असेल, कल्पनातीत पातकें करावयाचीं असतील त्याने विचाराला थारा देऊन चालायचें नाही. निर्ढावलेल्या पातक्यांना विसा-व्याच्या वेळीं मादक व्यसनांची जरूरी वाटते ती एवढ्याच मुळें असावी." म्हणजे तो मूळचा दुष्ट नाही. दुष्ट होण्याचा त्याचा निश्चय आहे. असें असल्यामुळेच शेवटीं तो दुष्कृत्यापासून परावृत्त होतो. आरंभींच्या या स्वगतांतून व्यक्त झालेली त्याची मनोवृत्ति व शेवटच्या प्रसंगांतील स्वगतांतून वसुंधरेच्या भाषणाचा त्याच्या मनावर क्षणोक्षणीं होणारा परिणाम व त्याचा ढळूं पाहणारा निश्चय या गोष्टी जर लक्षांत घेतल्या तर त्याचें शेवटचें परिवर्तन हें आकस्मिक व अस्वाभाविक असें निश्चयाने म्हणतां येणार नाही. कालिंदीवर त्याचें प्रेम नव्हतें. केवळ सोंग म्हणून त्याने तिच्याशीं लग्न केलें होतें. पण तरी सुद्धा तिच्या शुद्ध प्रेमाच्या भाषणांनी त्याचा वसुंधरेला भ्रष्ट करण्याचा निश्चय ढळूं पाहतो असें आढळ[illegible] दिसून आल्यामुळे पुढे जिच्यावर त्याचें प्रेम होतें व केवळ जिच्या बापाच्या अभद्र बोलण्यामुळे व जी आपल्याला न मिळाल्यामुळे झालेल्या निराशेने जिचा सूड घेण्याचा कृत्रिम निश्चय त्याने केला होता, तिच्या भाषणांनी व वर्तनाने त्याचा निश्चय ढळला व त्याच्यांत परिवर्तन झालें तर तें विसंगत खास म्हणतां येणार नाही.

गडकऱ्यांच्या नाटकांत खलपुरुषांना फार महत्वा-चें स्थान आहे. त्यांच्या बुद्धिचातुर्यावरच व त्यामुळें निर्माण झालेल्या प्रसंगांवरच नाटकाच्या कथानकाची उभारणी झालेली असते. आणि अशा या खलपुरुषांच्या मनोरचनेचा परिचय गडकऱ्यांनी स्वगताद्वारा करून दिला आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. यासाठीच वर कमलाकर व वृंदावन यांची मनोरचना स्वगताच्या आधारें स्पष्ट करून दाखविली. भावबंधनांतील घन-श्यामाच्या तोंडीं दोनच दीर्घ स्वगत भाषणें आहेत दोन्हींतूनहि त्याचे बेतच प्रामुख्याने कळून येतात व त्यामुळे कथारचनेला मदत होते. पण त्यांतल्या पहिल्या म्हणजे अंक १ प्रवेश ४ च्या शेवटीं असलेल्या स्वगत भाषणांतून त्याची मनोवृत्ति, तो दुष्ट होण्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

.ोष्टी कळतात. इतकेंच नव्हे तर या .का वाक्यावरून श्री. रा. शं. वाळिंबे यांनी .च्याच दुष्ट मनोवृत्तीचा होता असें अनुमान .पहा भाववंचन, प्रस्तावना पा. २०]. लति-.य्यानें तो दुखावला गेला हें सुद्धा त्याच्या एका .ाशा स्वगतावरूनच कळून येतें [अंक १ .. ३३]. 'मालतीला मागणी घालण्याचा हा .थावर कुठ तरी घनश्यामाच्या तोंडीं एखादें .यला पाहिजे होतें पण तें घालण्याचें अवधान .ा राहिलें नाही' अशी तक्रार १९२१ मध्यें .एका लेखांत प्रा. फडक्यांनी केली होती. त्या .ा अर्थच हा की खलपात्रांच्या निर्मितीला .चा हमखास उपयोग होतो. आणि गडकऱ्यांनी .ा नाटकांत तसा तो करून घेतला आहे.

.सुष्ट अशा प्रमुख पात्रांपैकी लतिकेचें उदाहरण .कारण अशा पात्रांपैकी सर्वांत जास्त दीर्घ स्वगत .ों तिच्याच वाट्याला आलीं आहेत.

अंक १ प्रवेश २ च्या सुरवातीचें व अंक ३ .ा ३ च्या आरंभीचें अशा दोन्ही स्वगतांतून .ाकेच्या मनांतील प्रसंगोपात्त विचारांचीं उलटसुलट .ोलनें चांगलीं व्यक्त झालीं आहेत. चौथ्या अंकाच्या .सऱ्या प्रवेशांतील, मालतीनें लतिकेची कानउघाडणी .त्यावर तिची मनःस्थिति दाखविणारें स्वगतहि .त्कृष्ट असून तिच्या मनाची त्या प्रसंगींची अवस्था, .ालतीच्या बोलण्याचा तिच्यावर झालेला परिणाम, .तला होऊं लागलेला पश्चात्ताप, घनश्यामाला शरण .ायचें या विचारानें तिच्या मानी मनाला पडलेला .च व होत असलेलें दुःख, सारें यथास्थित व्यक्त झालें आहे. त्याच्या पुढच्याच पानावरच्या स्वगतांत याच्या पुढची पायरी दाखविली आहे. विचारानें अभिमान सोडून देऊन आपल्या कर्माचें प्रायश्चित्त म्हणून घनश्यामाशीं लग्न करण्याला ती सिद्ध होते, हा बदल या स्वगतामुळेच लक्षांत येतो. याच प्रवेशांत घनश्यामाशीं संभाषण होऊन गेल्यानंतर आणखी एक स्वगत तिच्या तोंडीं आहे. त्यांतहि हींच विचारांचीं सूक्ष्म आंदोलनें दिसून येतात. आणि त्यामुळे तिच्या स्वभावाचा परिपोष फार चांगला झाला आहे. आरंभीं अल्लड व फटकळ असणारी ही नायिका पुढे गंभीर होत जाते व मालतीइतकाच त्याग करण्याची तयारी दाखविते. प्रा. फडक्यांनी म्हटल्याप्रमाणे 'नाटकाच्या आरंभीं मालतीच्या सुखासाठी म्हणून घनश्यामाला उणीं उत्तरें बोलणारी लतिका आणि नाटकाच्या शेवटीं पुन्हा मालतीच्याच सुखासाठी घनश्यामाचीं उणीं उत्तरें सहन करून त्याचे पाय देखील धरणारी लतिका या दोन चित्रांत केवढा तरी विरोध आहे!'—टाकीचे घाव. पण हा विरोध सुसंगत वाटतो तो मुख्यतः तिच्या मनाचीं स्थित्यंतरें या स्वगतांतून कळतात म्हणून. आणि फडक्यांच्याच म्हणण्याप्रमाणे लतिकेचें चित्र जें अवर्णनीय आणि आल्हाददायक झालें आहे त्यालाहि या स्वगतांचें फार मोठें सहाय्य झालें आहे.

लतिकेप्रमाणेच मालती व मनोहर यांच्या मनांतील भाव-भावना कळून येण्याला व त्यामुळें त्यांच्या स्वभावचित्रणाला त्यांच्या स्वगतांचा चांगला उपयोग झाला आहे. अंक २, प्रवेश ६ च्या सुरवातीला असलेलें मालतीचें स्वगत, तिसऱ्या अंकाच्या सुरवातीला असलेलें मनोहरचें स्वगत, हीं दोन्हीहि यासाठी पहावीं. चौथ्या अंकाच्या सुरवातीला असलेलें मनोहरचें स्वगतहि उल्लेखनीय आहे. यांपैकी पहिल्या दोन स्वगतांची भाषा बरीच काव्यमय असल्यामुळे थोडीशी कृत्रिम वाटते. पण त्याचा विचार पुढे. 'एकच प्याला' नाटकांतील अंक ४, प्रवेश दोन मधील सुधाकराचें स्वगत, त्याला झालेला पश्चात्ताप व्यक्त करतें. त्याच अंकांतील तिसऱ्या प्रवेशांतल्या त्याच्या स्वगतामुळे दारू सोडण्याच्या निश्चयानंतरची त्याची मनःस्थिति व्यक्त झाली आहे. आणि अंक ४, प्रवेश ३ च्या शेवटीं पुन्हा दारूकडे वळण्याचा आणि आणि शेवटपर्यंत तिला न सोडण्याचा त्याचा निश्चय स्वगतांतूनच व्यक्त होतो. या नाटकांतील भगीरथ आणि रामला.. यांच्या तोंडीं असलेल्या एकेका दीर्घ स्वगतांतून .ल. मनोविश्लेषण केलेलें आहे. एकंदरीनें पाहतां . दुस.. प्रमुख पात्रांच्या दीर्घ स्वगतांमुळें त्या त्य. होऊन मनोरचना लक्षांत येण्याला आणि त्यांचे. मात्र दुसऱ्.न तसेंच पुढील बेत कळून येण्याल. पुष्कळ.ांतिक्रियात्मक .ली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या दीर्घ स्वगतांसंबंधी आणखीहि एक दोन गोष्टी लक्षांत घ्यायला पाहिजेत. यांतील बहुतेक स्वगतें एखाद्या प्रवेशाच्या प्रारंभीं अगर शेवटीं आलेलीं आहेत आणि त्या त्या प्रसंगीं तीं तीं पात्रें एकटींच असल्याचें दिसून येतें. त्यामुळे त्यांच्या विचारांच्या आंदोलनांना कसलाहि अडथळा न होतां तीं चालू राहणें स्वाभाविक आहे. शिवाय त्या त्या प्रसंगीं त्या पात्रांच्या मनांत विचारचक्र सुरू होण्याला पूर्व कारणेंहि पुरेशीं आहेत. उदा० आताच उल्लेखिलेलें अंक ४, प्रवेश २ मधील पान ६२ वरचें सुधाकराचें स्वगत पहा. सिंधु आणि गीता बोलत असतांना त्यांचें भाषण सुधाकर आडून ऐकतो; गीतेने केलेल्या दारूबाजांच्या निर्भर्त्सनेचा आणि सिंधूच्या पतिपरायण मनाचा त्याच्या मनावर परिणाम होतो आणि तो विचार करूं लागतो, हें स्वाभाविकच आहे. भावबंधनांतील अंक ४, प्रवेश ३, पान १५४ वरील लतिकेच्या स्वगतालाहि असेंच कारण आहे. त्याच्यापूर्वी मालतीने तिची कानउघाडणी केलेली असते. प्रेमसंन्यासांतील ५ व्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांतील लीलेच्या आणि पुढे कमलाकराच्या स्वगतालाहि अशींच कारणें आहेत. जयंत फासावर लटकला असें डोळ्यांनी पाहून किंबहुना तें बघवेना म्हणून तिथून निघून घरांत गेलेल्या लीलेच्या मनांत विचारांचें काहूर न माजतें तरच नवल आणि तिच्या पाठोपाठच येणाऱ्या कमलाकराच्या मनांतहि सूडाचे भयंकर विचार न उसळते तरच तें अस्वाभाविक झालें असतें. तात्पर्य, स्वाभाविकतेची म्हणून जी कसोटी आरंभीं सांगितली तिच्या पूर्वभागाला हीं स्वगतें बव्हंशीं उतरतात. स्वाभाविकतेच्या कसोटीचा दुसरा भाग जो भाषेसंबंधीचा त्याचाहि येथे विचार करायला पाहिजे.

स्वगत म्हणजे विचार-विकार, भाव-भावना इ० होत. मनांतील या सगळ्या हालचाली कधी असंज्ञ असतात, कधी अर्धसंज्ञ असतात, तर कधी संज्ञ असतात. त्या जेव्हा असंज्ञ व अर्धसंज्ञ असतात व सूक्ष्म त्यांना मनांतल्या मनांत शब्दरूप मिळालेल्या मनांत संज्ञतेच्या क्षेत्रांत जेव्हा त्या येतात तेव्हा त्यांना जो एकजात शब्दरूप प्राप्त झालेलें असतें. यां तिन्ही [illegible] महत्त्वा[illegible]चें [illegible]सिक हालचाली व्यक्त करणें जर आवश्यक असेल तर त्यांना शब्दरूप दिल्याखेरीज गत्यंतर नाही. पहिल्या दोन प्रकारांतील हालचालींना मुळांत शब्दरूप नसतेंच तेव्हा त्यांना कसेंहि शब्दरूप दिलें तरी चालण्यासारखें आहे तिसऱ्या म्हणजे संज्ञतेच्या क्षेत्रांतील हालचालींना कमी अधिक प्रमाणांत मनांतच शब्दरूप मिळालेलें असतें तेव्हा त्यांना स्वगतांत व्यक्त करण्यासाठी ज्या शब्दांची व वाक्यांची योजना करायची ते शब्द व तीं वाक्यें मात्र मनांतील शब्दांच्या व वाक्यांच्या सारखीं असणें आवश्यक ठरतें आणि नाटकांतील स्वगतांत मुख्यतः तिसऱ्या क्षेत्रांतील हालचालीच दाखविल्या असल्यामुळे स्वगताची भाषा साधी, सहज, थोडक्यांत भाव व्यक्त करणारी, विचारांचीं उलट सुलट आंदोलनें दाखविणारी अशीच पाहिजे. या दृष्टीने गडकऱ्यांच्या नाटकांतील या दीर्घ स्वगतांच्या भाषेकडे पाहि त्यास अत्यंत साध्या भाषेपासून तों अत्यंत कृत्रि भाषेपर्यंत अनेक प्रकार दिसून येतात. लतिकेच्या ए स्वगतांतील ही साधी भाषा पहा—"वेडी मालतीता विचारी! मलाच ती वेडी समजते! एखाद्या माणसाचा बोलका स्वभाव असला म्हणजे त्याच्या बोलण्यांत कधी का अर्थ नसतो?......या वयांत बाबा लग्न करायल तयार झाले; आणि आता सुद्धा त्यांना तोडून बो नको कां?" वगैरे याच रीतीच्या साध्या, सुटसुटीत विचारांचीं आंदोलनें दाखविणाऱ्या भाषेंत हें संपू स्वगत लिहिलें आहे. त्याचप्रमाणे अंक ४, प्रवेश ३ मधील लतिकेच्याच या दुसऱ्या स्वगताची रचना पहा- '......मालतीताई, मालतीताई एकदम इतकें सारें क ऐकवून गेलीस? स्वच्छंदी, लाडाने शेफारलेली, वळण नाही, बेफाट, बे-जबाबदार? लतिके, लतिके, काय तुझ्या नांवाची शोभा ही!......असें रडून काय होणार? जन्मभर अशी रडत बसलें तरी कांही होणार आहे कां? कांहीच होणार नाही कां?......मग या सर्व जीवांच्या वरचें संकट टाळण्यासाठी मी आता करूं तरी काय? घनश्यामांना दीनपणें शरण जाऊं? ......घनश्यामांना शरण! देवा, देवा, काय ही वेळ आणलीस माझ्यावर!' या स्वगतांत लतिकेचे भाव व विचार कसे पूर्णपणें व साध्या भाषेंत उतरले आहेत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हा. याच्या उलट पुण्यप्रभावांतील अंक १ प्रवेश २ मधील वृंदावनाच्या स्वगतांतील ही अलंकारिक कृत्रिम भाषा पहा—

'कोमल चंद्रिकेने कठिण चंद्रकांत पाझरतो. झुळझुळत्या झऱ्याच्या नाजुक झरणीने काळ्या कभिन्न कड्यालाहि कंगोरा पडतो! त्याप्रमाणे हिच्या अश्रूंच्या झरपणीने माझ्या हृदयाचेंहि पाणी होऊन जाईल. आणि कमलकराचें हें स्वगत पहा—' अहाहा! या वर्षाकालीन संध्यासमयाची किती भीपण रमणीय शोभा ... गगन मार्ग चालण्याच्या श्रमाने उरीं फुटल्यामुळे ... रक्ताची गुळणी टाकून नुकताच प्राण सोडिला ... रक्ताने भरलेल्या या त्याच्या मृत्युशय्येवर हा ... ढगाचा शेणगोळा फिरवीत आहे!' पुढील सारेंच वर्णन भीषण-रमणीय असून तें करण्यांत गडकऱ्यांच्या प्रतिभेचें व भाषाशैलीचें अलौकिक सामर्थ्य प्रगट झालें ... पण हें सगळें गडकऱ्यांचें आहे. यांतलें कमला-करांचें किती हा प्रश्न आहे. मात्र या स्वगताच्या बाब-तींत एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे की, कमला-कराच्या मनोवृत्तीशीं हें वर्णन सुसंगत आहे. भाव ... यथार्थ आहे, भाषेचाच काय तो (स्वगताची म्हणून) ... आहे. भावबंधनांतील मालतीचें अंक २, प्रवेश ६ मधील व मनोहराचें अंक ३, प्रवेश ६ मधील स्वगत हीं ... काव्यमय असून कृत्रिम वाटतात.

स्वगतांची भाषा अलंकारिकतेमुळेच कृत्रिम होते असें नव्हे तर साधी असूनहि विशिष्ट वाक्यरचनेमुळे ती स्वगताला अयोग्य ठरूं शकते. यासाठी एक दोन उदाहरणें देणें इष्ट होईल. सुधाकराच्या या लहानशाच स्वगतांतील ही वाक्यरचना पहा. 'अरेरे! काय केलं मी हें? या उदार मनाच्या पण गरीब कुळीच्या भोळ्या मुलीनं सहजासहजीं सिंधूच्या हृदयाला केवढी जबर जखम केली ही! धनसंपन्नाची जी कन्या, ...संपन्नाची जी पत्नी, तिच्या उपासमारीची दया ... या उदार मुलीनं तिला सदावर्ताचा उपदेश ...' या स्वगतांतून गीतेच्या स्वभावावर प्रकाश ...याचा प्रयत्न केल्यामुळे वाक्यरचना अशी कृत्रिम ...ली आहे. ही वाक्यरचना अशी करतां येईल; 'या भोळ्या गीतेनं सिंधूच्या मनाला किती दुखविलं! पण तिला याची काय कल्पना! सिंधूला सदावर्ताचा उपदेश! सुधाकरा काय हा तुझा संसार!' दुसरें एक उदाहरण सुधाकराच्याच स्वगताचें पहा. हें स्वगत दीर्घ आहे. त्यांतलें हें एकच वाक्य पहा. 'अगदी लहा-नपणीं एका इंग्रजी गोष्टींत वीस वर्षांच्या अखंड झोपें-तून जागा झालेल्या एका मनुष्याची प्रथम जगाकडे पाहतांना जी विचित्र मनस्थिति वर्णिली आहे तिचं आज मला अनुभवानं प्रत्यंतर पटत आहे.' स्वगताच्या दृष्टीने मला हें असें बदलतां येईल. 'माझी स्थिति त्या 'रिपव्हॅन विंकल्' प्रमाणेच झाली आहे. तो दीर्घ झोपें-तून उठला होता. मीहि व्यसनाच्या धुंदींतून जागा झालों आहें.' या दोन उदाहरणांवरून स्वगताच्या भाषेसंबंधी नीट कल्पना येईल असें वाटतें. गडकऱ्यांच्या नाटकांत साधी व कृत्रिम दोन्ही प्रकारच्या भाषेचीं उदाहरणें आहेत. पण मोजदाद केली तर स्वाभाविक व साध्या भाषेचीं उदाहरणें जास्त भरतील.

या भाषेच्या कृत्रिमपणापेक्षाहि कांही ठिकाणीं स्वगतांत पदें आलीं आहेत. तो प्रकार अधिक कृत्रिम म्हणावा लागेल. अशीं स्थळें गडकऱ्यांच्या नाटकांत आहेत पण तीं थोडीं आहेत. (पुण्यप्रभावांत ५, एकच प्याल्यांत ४ व भावबंधनांत १३ मिळून २२.)

आतापर्यंत दीर्घ स्वगतांचाच विचार मुख्यतः केला पण त्यांतील पुष्कळसा भाग लहान स्वगतांनाहि लागू होण्यासारखाच आहे. लहान स्वगतांचा विचार यापुढे थोडक्यांत केला आहे. गडकऱ्यांच्या या चार नाटकांत लहान स्वगतें अनेक आलीं आहेत. त्यांची एकंदर संख्या सुमारें ३०० भरते. या लहान ... बाबतींत चटकन् लक्षांत येण्यासारखी ... तीं मुख्यतः दोन किंवा अधिक व्यक्तींचा ... चालू असतांना आलीं आहेत. विचार केला असतां हें योग्यच आहे असें दिसेल. एक व्यक्ति बोलत असतां तिच्या त्या बोलण्याचा दुसऱ्या ... तोवर कांही तरी परिणाम होऊन तिच्या आपला ... सली तरी प्रतिक्रिया होतेच. मात्र दुसरी ... असल्यामुळे मनांतील या प्रतिक्रियात्मक ... ना चटकन् आळा घालून

तिच्याशीं बोलणें प्राप्त असतें. म्हणून येथे 'स्वगत' दीर्घ असूं शकत नाही.

ही जी लहानशी प्रतिक्रिया स्वगतांतून दाखवायची ती उघड बोलून दाखविण्यासारखी तर नसावी (तशी असेल तर ती उघड भाषणांतच येईल.) पण प्रेक्षकांना कळल्यापासून कांही तरी लाभ असावा. (प्रेक्षकांचा विचार अर्थातच अप्रत्यक्ष.) घनश्याम मालतीला मागणी घालतो. लतिका दुरुत्तरें करते. घनश्यामहि उलट उत्तरें देतो. पण मध्येच तो स्वगत म्हणतो 'मी जास्त बोलत चाल ो' (भावबंधन पृ. ३३). आणि पुढे त्याचा सूर बदलतो. हें संवादांतील स्वगत आहे. येथे घनश्यामाला जास्त विचार करण्याला सवड नाही. म्हणून तें लहानसेंच आहे. बरें हा विचार उघडपणें कोणाहि पात्राला कळविणें इष्ट नव्हतें. पण त्याचबरोबर प्रेक्षकांना तो कळणें महत्त्वाचें होतें म्हणून तो स्वगतांतच व्यक्त करणें आवश्यक झालें आहे. प्रेमसंन्यासांतील हीं दोन स्वगतें पहा— अंक ४ च्या प्रारंभीं विद्याधर भूतमहालांत एकटा असतो. व दरोडेखोर येतो. विद्याधर विचारतो 'कोण रे बाबा तूं?' तो म्हणतो 'मी आपला मानकाप्या दरोडेखोर नव्हे का?' यानंतर विद्याधराचें लहानसें स्वगत आहे—'हर हर, परमेश्वरा, निव्वळ थट्टा मांडली आहेस आमची! मी साह्याची अपेक्षा करतांच हें उत्तर पाठविलेंस?' हा विचार स्वाभाविकच आहे. तो येतो न येतो तेवढ्यांत दरोडेखोर पुढे म्हणतो—'का, अंधारांतली ओळख उजेडांत पटत नाही वाटते? आपणच नाही का त्या दिवशीं रात्रीं ती पेटी मला न्यायला सांगितली?' यानंतर विद्याधराचें 'स्वगत' आहे—'पेटी! खास कमलाकराचें कांही कुलंगडें असावें हें!' आणि हें ध्यानांत येतांच तो उघड म्हणतो 'पेटी! हां हां, ती ेटी म्हणतोस? आलें लक्षांत. बरें मग, तिचें काय म्हणतोस आता?' या दोन लहान स्वगतांमुळे हा प्रसंग कितो रंगलाअंज अ त, या स्वगतांतून विद्याधराच्या विचारांचा व अर्थसंज्ञ ेक्षकांना कळून आला नसता तर त्याच्या केवरूप मिळविणामुळे या दरोडेखोराचा व विद्याधरा तेव्हा त्यांनाबंध असावा असें वाटून ते बुचकळ्यांत पडलें तिन्ही या स्वगतामुळे सर्व उलगडा होतो. पुन्हा हीं स्वगतें अस्वाभाविक नाहीत. विद्याधर क्षणभर विचारांत पडतो तोंच दरोडेखोर पुन्हा बोलतो. त्यामुळ कमलाकराचें हें कुलंगडें असावें असा संशय विद्याधराला येतो व तो त्या अनुरोधाने पुढे बोलतो. हा प्रसंग स्वगताच्या मदतीशिवाय असा रंगवितांच आला नसता.

पुण्यप्रभावांतील अंक १, प्रवेश २ मधील हें एक उदाहरण पहा. कंकण व वृंदावन यांचा संवाद चाललेला आहे. कंकण वृंदावनाला सांगतो की, कालिंदीची नजर आपल्यावर आहे. तें ऐकतांच वृंदावन म्हणतो, 'बेवकूफ! तुझी जीभ फारच लांब व्हायला लागली', पण कंकण घन्याचेच 'लांब कान' काढतो आणि वृंदावन न रागावतां त्याला क्षमा करतो. वृंदावनानें असें क वागावें हें एरव्हीं प्रेक्षकांना कळणार नाही. पण दरम्यानच्या स्वगतानें हा उलगडा होतो. वृंदावनाचे स्वगत असें—'माझ्यापेक्षा उच्च दर्जाच्या भूपाला याच्या हातानें खाली लोटण्यासाठी थोडा वेळ याला असें डोक्यावर बसवून घेणें भाग आहे.' स्वगतामुळे वृंदावनाच्या व गण्याविषयी प्रेक्षकांचा गैरसमज होत नाही.

या उदाहरणांवरून विशिष्ट प्रसंगीं एखादी व्यक्ति विशिष्ट रीतीनेच कां वागते याचा उलगडा स्वगतामुळे होत असल्याने त्यांचा नाटकाला कसा उपयोग होतो हें दिसून येईल. गडकऱ्यांनी लहान स्वगतांचा असा उपयोग भरपूर करून घेतला आहे.

या लहान स्वगतांचा विनोदनिर्मितीलाहि उपयोग होतो. गडकऱ्यांच्या नाटकांतहि तसा तो केलेला दिसतो. या बाबतींत दोन प्रकार दिसून येतात. पहिला प्रकार हा की, जेथे स्वगताची योजना अन्य दृष्टीनें स्वाभाविक अशी होऊन त्यापासून विनोदालाहि साहाय्य झालें आहे आणि दुसरा प्रकार असा की जेथे केवळ विनोदासाठी स्वगताची योजना झाली असल्याचें उघडपणें कळून येतें. यांत पहिला योग्य व दुसरा अयोग्य मानला पाहिजे. गडकऱ्यांच्या नाटकांत दोन्ही प्रकारची उदाहरणें आहेत. प्रेमसंन्यासांतील अंक २, प्रवेश ४ मध्ये मथुरेच्या तोंडीं जीं स्वगतें आहेत तीं दुसऱ्या प्रकारांत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बसण्यासारखींच आहेत. बानगीदाखल हें एक उदाहरण पहा. गोकुळ विद्याधराजवळ मथुरेच्या कागाळ्या करीत आहे आणि मथुरा बाहेरून हळूच येते. ती आल्याची जाणीव गोकुळला नाही. तो म्हणतो 'तिच्या रूपाचें वर्णन तर विचारूंच नका. दुसऱ्या कोणत्या प्राण्याशीं सादृश्य नाही, एवढ्यासाठीच तिला मनुष्य म्हणायचें' यानंतर मथुरेचें स्वगत आहे 'आणि यांना मनुष्य म्हणावयाचें कारण नाही.' हें वाक्य केवळ विनोदासाठीच आहे. चौथ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांत आरंभींच गोकुळच्या तोंडीं असलेलें दीर्घ स्वगतहि मुख्यत: विनोदासाठीच योजलें आहे. त्यांत विचार थोडे असून गोकुळच्या तोंडीं लेखक बोलत असल्याचा भास होतो. याच प्रवेशांतील शेवटचें गोकुळचें स्वगतहि असेंच आहे. पुण्यप्रभाव नाटकांत अंक १, प्रवेश ३, पान ४२ वरील नूपुरचें स्वगत आणि अंक २, प्रवेश ३ मधील कंकणचें प्रवेशभराचें स्वगत हीं दोन्ही केवळ विनोदासाठी असून अनावश्यक आहेत. भावबंधनांतील चौथ्या अंकाच्या चौथ्या प्रवेशाच्या सुरवातीचें महेश्वराचें स्वगतहि याच कोटींतलें आहे. तसेंच महेश्वर, इंदु व बिंदु यांचीं कांही स्वगतें याच प्रकारचीं आहेत. गोकुळ, कंकण, नूपुर यांच्याहि कांही स्वगतांच्या बाबतींत हेंच म्हणतां येईल. हीं सगळीं पात्रें मुख्यत: विनोदासाठीच निर्माण केलीं आहेत ही गोष्ट खरी; पण त्यांच्या स्वगतांतहि उचित–अनुचित भेद करतां येतातच.

आता पहिल्या म्हणजे योग्य प्रकारच्या स्वगताचीं उदाहणें पहा. प्रेमसंन्यासांतील अंक २, प्रवेश ५ मध्ये लीला व जयंत यांचें हितगुज चाललें असतांना तात्यासाहेब, गोकुळ आदि मंडळी तेथे येतात. तात्यासाहेब खवळतात. सुशीला येते व वीणेचें पत्र आणून देते. या प्रसंगीं गोकुळचें स्वगत आहे, 'वायकांना पाय फुटण्याचा हा काळ दिसतो. सुमन गेली, वीणाताई गेली, लीलाताई गेल्यासारखीच आहे. आमच्या घरांतली सुद्धा गेली...' हें स्वगत विनोद निर्माण करतें. अप्रत्यक्ष रीतीनें विनोदासाठीच तें योजलें आहे. पण प्रसंगांत स्वाभाविकरीत्या बसणारें असें तें आहे.

भावबंधन नाटकांत अशा स्वगतांचीं अनेक उदाहरणें सापडतील. पहिल्या अंकाच्या पहिल्याच प्रवेशांत धुंडिराज व घनश्यामाचा संवाद चालू असतां घनश्यामाच्या तोंडीं मधून मधून जीं स्वगत भाषणें आहेत तीं जितकीं स्वाभाविक तितकींच विनोदाला पोषक आहेत. पुढे दुसऱ्याच प्रवेशांत इंदु बिंदूच्या प्रश्नाला उत्तर देण्याची टाळाटाळ करीत असलेल्या प्रभाकराच्या तोंडीं जीं दोन तीन स्वगतें आहेत तींहि बहारीचीं आहेत. स्वाभाविक स्वगतांतून भरपूर विनोद निर्माण झाल्याचा या नाटकांतील सर्वोत्कृष्ट प्रसंग म्हणजे दुसऱ्या अंकांतील पहिला प्रवेश होय. कानडी म्हाताऱ्याच्या वेषांतील प्रभाकराला कानडी गवयाच्या वेषांतील महेश्वराशीं कानडींत प्रश्नोत्तरें करण्यास घनेश्वर जेव्हा सांगतो तेव्हा घनश्यामासुद्धा त्या सर्वांनाच 'ही खरी फजितीची वेळ' असें वाटतें. पण उघड बोलण्याची सोय नव्हती. भावबंधनांत या प्रकारचीं आणखीहि उदाहरणें आहेत पण हें सर्वोत्कृष्ट म्हणायला हरकत नाही.

वरील उदाहरणांवरून स्वगताचे कांही उपयोग कळून आलेच असतील. त्याखेरीजहि स्वगताचे कांही उपयोग गडकऱ्यांनी आपल्या नाटकांत करून घेतले आहेत. अशा उपयोगांपैकी पहिला उपयोग म्हणजे सृष्टिवर्णनासाठी केलेला होय. प्रेमसंन्यासाच्या दुसऱ्या अंकाच्या अगदी आरंभीं सुमारें दीडपान विद्याधराचें स्वगत आहे. त्यांत मुख्यत: सृष्टिशोभाच वर्णिली आहे. कमलाकरानें एका स्वगतांत भीषण–रमणीय शोभेचें वर्णन केलेलं आहे. त्याचा उल्लेख मागे निराळ्या संदर्भांत आलाच आहे. तिसऱ्या अंकाच्या शेवटीं जयंताच्या लहानशा स्वगतांत असेंच वर्णन आहे. पण [illegible] प्रकार थोडा निराळा आहे. जयंताला कमलाकरानें बागेंत पेटी आणून [illegible] हा प्रसंग आहे. वे[illegible] [illegible] वातावरण[illegible] मी त्यां निघोला उणीव [illegible] पाठवून देतों......" करणें [illegible] येई[illegible]

आपला,

मा. श्री. अणे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

कांही ठिकाणीं एखादा प्रसंग प्रेक्षकांना विशेषतः सामान्य प्रेक्षकांना नीट समजावा म्हणून गडकऱ्यांनी स्वगताची योजना केलेली दिसते. भाववंधनांत यांचीं ठळक उदाहरणें सापडतात. चौथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांतील मनोहराचें जें स्वगत आहे तें पहावें. तो स्मशानांत आलेला आहे. तिथे त्याच्या मनांत कोणते विचार येतात, मालतीचें चित्र तिथे पुरून टाकावें असें तो कसें ठरवितो, तें पुरून टाकण्याच्या प्रयत्नांत त्या हिरव्या दगडाकडे त्याचें लक्ष कसें जातें व अखेर त्याच्या हातांत तो डबा आणि ते कागद कसे येतात— हें सगळें शेवटच्या रांगेंत बसणाऱ्या प्रेक्षकांना नुसतें पाहण्यानें लक्षांत येणार नाही. त्यासाठी शब्दांचीच गरज होती. ती गरज या स्वगतानें भागविली आहे. म्हणूनच या स्वगताची रचना दृश्यवर्णनपर झाली आहे. तिसऱ्या अंकाच्या सुरवातीला असलेलें घनश्यामाचें स्वगतहि अगदी याच प्रकारचें आहे. पुण्यप्रभावांतील सहाव्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत कालिंदीच्या तोंडीं असलेलें लांबच लांब स्वगतहि याच कारणासाठी घातलें गेलें आहे. तीहि स्मशानांतच गेलेली असते आणि केतनाच्या देहाला मूठमाती देते. त्याप्रसंगीं होणाऱ्या तिच्या हालचालींचें ज्ञान प्रेक्षकांना या स्वगतांतूनच करून दिलें आहे.

या दोन प्रकारांखेरीज इतरहि बऱ्याच प्रकारांनी स्वगताचा उपयोग गडकऱ्यांनी केला आहे. प्रेक्षकांना एखादी बातमी देण्यासाठी, एखाद्या पात्राविषयी अगर त्याच्या वर्तनाविषयी गैरसमज होऊं नये म्हणून ...ष्कंभाप्रमाणे, पूर्वसूत्र लक्षांत यावें म्हणून, खलपुरुषांचे योजना कळाव्यात म्हणून इ० प्रकारें हा यानंतर ... आहे. यांपैकी कांहींची उदाहरणें कमलाकराचे ... ये... गेलीं आहेत. इतरांचीं ध्यानांत येतांच त... उघड आवश्यकता आहेच ...टी म्हणतोस ? आलें लक्षा... म्हणतोस आता ? ' या दोन लहान स... प्रसंग किती रंगलासंज्ञ ...पात, या स्वगत... व धराच्या विचारांचा व अर्धसंज्ञ ...क्षकांना कळला नसता तर त्याच्या केवारूप मिळविणामुळे या ... खोराचा व विद्याधराच तेव्हा त्यांनावंध असाव. वाटून ते बुचकळयांत पडले तिन्ही ... या स्वगता...

...या नाटकांतील बव्हंश स्वगतें कमी अधिक प्रमाणांत उतरतात असेंच वरील विवेचनावरून लक्षांत येईल. त्याबरोबरच भाषेची कृत्रिमता, अनावश्यक उपयोग, केवळ विनोदासाठी उपयोग इ. त्यांतील दोषहि उघडकीला येतील. अशीं दोषस्थलें एकंदरीनें थोडींच आहेत असेंहि दिसेल. एकंदरीनें गडकऱ्यांच्या नाटकांत स्वगताचा भरणा पुष्कळ आहे, अशी जर कोणाची कल्पना आतापर्यंतच्या विवेचनावरून झाली असेल तर ती रास्तच म्हणावी लागेल, पण पुष्कळ म्हणजे किती हें आकडेवारीनें लक्षांत घ्यायला पाहिजे. म्हणजे 'गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगतांच्या ओळी उघड भाषणांच्या ओळींपेक्षा अधिक भरतील' अशीं क्वचित ऐकूं येणारीं वाक्यें कितपत तथ्य आहेत हें कळून येईल. सामाजिक क्षेत्रांत तसेंच वाङ्मयीन टीकेच्या क्षेत्रांतहि आकडेवारीनें एरव्हीचीं अनेक विधानें चुकीचीं ठरण्याचा संभव असतो. प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव व भाववंधन या तीन्ही नाटकांत उघड व स्वगत यांच्या ओळींचें प्रमाण ४ : १ असें आहे आणि एकच प्याल्यांत अगदीच कमी म्हणजे १२ १ असें तें आहे. ४ : १ हें प्रमाण सुद्धा जास्त आहे असें वाटेल. परंतु स्वगतासंबंधी आरंभीं जी भूमिका घेतली आहे ती स्वीकारल्यावर स्वगतांच्या बाबतींत निराळा न्याय लागूं करतां येणार नाही. नाटकांत काटकसरीला महत्त्व आहे. म्हणून उघड भाषणेंहि आटोपशीर असण्याची जेवढी गरज आहे, तेवढीच स्वगत भाषणेंहि सुटसुटीत असण्याची गरज आहे. उलट असेंहि म्हणतां येईल की उघड भाषण म्हणजेच संभाषण हेंच अधिक सुटसुटीत असण्याची वास्तवतेच्या दृष्टीनें जास्त गरज आहे. कारण दोन व्यक्ति बोलतांना केवळ एकाच व्यक्तीनें लांबच लांब व अखंड भाषण करणें अस्वाभाविक आहे. दुसऱ्या व्यक्तीकडूनहि प्रत्युत्तराची अपेक्षा असते. पण एखाद्या व्यक्तीच्या मनांत—ती जर एकटीच असेल तर—विचार किती व किती वेळ यावेत याला मर्यादा नाही. म्हणून एकच प्याल्यांतील अंक ४ प्रवेश ४ मधील सुधाकराचीं एका पाठोपाठ आलेलीं तीन–तीन पानांचीं उघड भाषणें जितकीं अस्वाभाविक व कृत्रिम म्हणतां येतील तितकीं पांचव्या अंकाच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ा प्रवेशांतलें भगीरथाचें व तिसऱ्या प्रवेशांतलें लचें अशीं दोन दीर्घ स्वगतें कृत्रिम व भाविक म्हणतां येणार नाहीत.

शेवटीं आणखी एकच विचार मांडून मी हें वितों. 'स्वगत' म्हणजे मनोविश्लेषण असल्यामुळे याचा उपयोग करण्यासाठी नाटककाराच्या ठिकाणी नवी मनाचें सूक्ष्म व मार्मिक ज्ञान असावें लागतें. न्याय नाटकांत लेखकाला स्वतः प्रगट होऊन हें विश्लेषण करावयाचें नसल्यामुळे स्वगतांतून तें रण्यासाठी त्याच्या ठिकाणीं मार्मिकता, योजकता, यम, भाषाप्रभुत्व (भाषाप्रभुत्व म्हणजे केवळ ब्दसंपत्ति मोठी असणें नव्हे, तर भाषेला वाटेल तशी ाकवितां येणें) या गुणांची आवश्यकता असते. हें क्षांत घेतलें म्हणजे स्वगताकडे गौणत्वाच्या भावनेनें ाहणें कठीण आहे. स्वगत हा रंगभूमीला सहाय्य रणाराच नव्हे तर नाट्याची रंगत वाढविणारा, अभिनयाला वाव देणारा, व्यक्तिदर्शनाला परिपूर्णता आणून देणारा व कथानकाला सुसंघटित करणारा असा एक अत्यंत आवश्यक प्रकार आहे. नवीन नाटकांतून त्याला वगळण्यांत आलें आहे. पण त्यामुळे कांही प्रमाणांत तरी नाटकांची रसहानीहि झाली आहे. " 'स्वगत' भाषणांवर आधुनिक युरोपियन नाट्यशास्त्राने कडकडीत बहिष्कार घातला आहे. गडकऱ्यांनी या बहिष्काराचा विचारच केला नाही" अशी तक्रार श्री. वि. स. खांडेकर यांनी केली आहे. परंतु गडकऱ्यांच्या स्वगतांतील दोष जमेला धरूनहि असेंच म्हणावें लागेल की त्यांनी स्वगतांवर एकजात बहिष्कार घातला नाही हें योग्यच झालें.

टीप : या लेखांत जे पृष्ठांक आले आहेत ते त्या त्या पुस्तकांच्या खाली उल्लेखिलेल्या आवृत्तींतील आहेत.

१–प्रेमसंन्यास–पांचवी आवृत्ति–परचुरे पुराणिक आणि मंडळी.
२–पुण्यप्रभाव–पांचवी आवृत्ति १९२७–„ „ „
३–एकच प्याला–वि. सी गुर्जरांची प्रस्तावना असलेली–आरंभींचीं पानें नाहीत.
४–भावबंधन–दहावी आवृत्ति–प्रकाशक, अ. मो. पुराणिक.

कै० ह. ना. नेने स्मारक-निधि

कै० ह. ना. नेने स्मारक-निधीसंबंधी
लो. ना. मा. श्री. अणे लिहितात—
हरिभाऊंच्या कांही स्नेह्यांनी व चाहत्यांनी
त्यांच्या स्मारकानिमित्त एक निधि उभा करण्याचें
ठरविलें हें वाचून समाधान वाटलें. मी त्या निधीला
रु. २५ थोड्याच दिवसांनी पाठवून देतों......"

लक्ष्मीनिवास,
३४२ सदाशिव पेठ,
पुणें २, ता. ३–१–५५

आपला,
मा. श्री. अणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुप्तकाल व प्रा. मिराशींची तद्विषयक विचारसरणी

क्रु. मो. शेंबवणेकर

श्रोत्रियस्येव ते राजन् ! बालकस्याल्पमेधसः ।
अनुवाहकता बुद्धिर्नैषा तत्त्वार्थदर्शिनी ॥
(काशिका)

प्रा. मिराशींनी आमच्या Glamour About the Guptas या पुस्तकाचें परीक्षण करण्याच्या निमित्ताने जी विचारसरणी व तर्कशैली 'युगवाणी'च्या दीपावली अंकांत प्रगट केली आहे तिचा विचार वाचकांच्या मार्गदर्शनाकरिता करणें जरूर आहे. त्यांनी प्रथमच सांगून टाकलें आहे की, आमच्या विवाद्य विधानांना डॉ. अळतेकरांनी व स्वतः त्यांनी वेळोवेळीं उत्तरें दिलीं आहेत. परंतु आम्ही अभिनिवेशाने फिरून फिरून तींच प्रतिपादन करतों असा त्यांचा दावा आहे.

सन १९५० चे प्रारंभीं Indian Republic या इंग्लिश शब्दाबद्दल मराठींत कोणता शब्दप्रयोग रूढ करावा याविषयी 'केसरी'त चर्चा चालू होती. आणि डॉ. अळतेकरांनी एक दोन लेख लिहून रिपब्लिक म्हणजे "गणराज्य" आणि इंडियन रिपब्लिक म्हणजे "भारतीय गणराज्य" अशी शब्दयोजना सुचविली होती. हिंदुस्थानांत प्राचीन काळीं गणराज्यें म्हणजे प्रजासत्ताक राज्यें होतीं व ग्रीक आणि रोमन इतिहासकारांनी तसे उल्लेखहि आपापल्या ग्रंथांत केले आहेत, वगैरे प्रमाणेंहि त्यांनी दिली होतीं. कै. काशीप्रसाद जयस्वाल यांचे ग्रंथांत तर या मताचा जोराने आविष्कार केलेला आढळतो. विशेषतः पाणिनीचे सूत्रांत संघ शब्द अनेक वेळां येतो, इतकेंच नव्हे तर नानाप्रकारच्या व नांवांच्या संघांचा उल्लेख तेथे आढळतो. संघ आणि गण हे पर्याय शब्द असल्याने हा वाद विशेषतः आता आमचे प्रस्तुत पुस्तकांत अंतर्भूत केलेल्या, परंतु वीस वर्षांपूर्वी प्रथम प्रसि[द्ध] झालेल्या A Puzzle in Indian Epigraph[y] या लेखापासून जास्त जोरास लागला. डॉ. अळतेकरां[च्या] समग्र मुद्द्यांचा सविस्तर परामर्श ग्वाल्हेर दरबा[राने] विक्रम द्विसहस्राब्दीचे निमित्ताने प्रकाशि[त] केलेल्या मराठी खंडांत 'श्रीविक्रमादित्य नृपति' लेखांत आम्ही घेतला आहे. आणि त्या खंडाचे शेव[टी] जे अनेक विद्वान् लोकांचे अभिप्राय जोडलेले आ[हेत] त्यांमध्ये डॉ. बेलवलकर, डॉ. कुर्तकोटी व नाग[पूर] विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु (Vice-Chancello[r]) कै. नानासाहेब केदार वगैरे विद्वानांनी आमचे लेखाचा व विशेषतः आम्ही महाभाष्य, काशिका वगैरे सर्वमान्य ग्रंथांचे आधारें दाखविलेल्या 'गण' शब्दाचे अर्थाचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. कै. केदारांनी तर आमचे लेखास जें प्रथमस्थान त्या खंडांत दिलें गेलें आहे तें सर्वथा योग्य आहे असेंही आपलें मत तेथे व्यक्त केलें आहे. 'प्रसाद' मध्ये आम्ही मिराशींचे मुद्द्यांचा निरास 'कालिदास व अश्वघोष' या लेखांत केला आहे. त्यांतहि आमच्या मताविषयी डॉ. गंगानाथ झा, रवींद्रनाथ टागोर वगैरे दिवंगत, आणि ईश्वरकृपेने आज विद्यमान असलेल्या प्राध्यापकांनी जे अनुकूल अभिप्राय दिले. आणि मतस्वीकार केला तो त्यांचे नजरेस आणल्यावर श्री. मिराशींनी "उपरिनिर्दिष्ट विद्वान् केवढ्याहि योग्यतेचे असले तरी प्रस्तुत वादांत ते अधिकारी नव्हत" असा आपला स्पष्ट अभिप्राय आपल्या उत्तरांत दिला आहे ! आणि याचे उलट जे त्यांच्याशीं सहमत ते, म्हणजे प्रा. वेलणकर, डॉ. अळतेकर (यांत आता भारतीय विद्याभवनचे डॉ. पुसाळकर यांचाहि अन्तर्भाव करावा करावा लागेल)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

...च्चपदवीभूषित करून त्यांचे मताचा गौरव-
...उल्लेख केला आहे. अर्थात् श्री. मिराशी स्वमतें
...आपणास विजयी समजत असल्यास नवल नाही.

गुप्तकाळ हा संस्कृत विद्येचा व ब्राह्मणी पुनरु-
...नाचा उर्जितकाल असें सर्व युरोपियन संस्कृतज्ञ
...चे भारतीय अनुयायी गेल्या अर्धशतकभर किंवा
...न जास्त काळ मानीत आले आहेत. तें निराधार
...याचें आम्हीं आपल्या पुस्तकांत प्रतिपादिलें
... कारण, ब्राह्मणी संस्कृत वाङ्मयांत किंवा
...त्रहि त्याला मुळीच आधार मिळत नाही. त्यावर
...शींचें म्हणणें असें की गुप्तकालीन वाङ्मय बरेचसें
...ळाच्या ओघांत नष्ट झालें; आणि दुसरें कारण
...जे आपल्या आश्रयदात्याचा किंवा त्याच्या
...ळाचा स्पष्ट निर्देश करण्याची प्रवृत्ति संस्कृत ग्रंथ-
...रांमध्ये दिसत नाही. यावर आम्ही त्यांना एवढेंच
...चारतों की जेव्हा जेव्हा व जेथे जेथे विद्येचें पुनरु-
...जीवन झालें असें आपण पाहतों तेव्हा तेव्हा व तेथे
...थे तें नष्टच झालें असें आपणास आढळतें काय?
...सें असेल तर भोजराजाच्या वेळीं किंवा हेमचंद्राच्या
...ळीं, अथवा सायण माधवाचार्यांच्या काळीं विद्येचा
...त्कर्षबिंदु जो वाङ्मयांत विखुरलेला आढळतो,
...केंवा अन्यसंदर्भानें प्रतीत होतो, तो तसा झाला
...सता. पुनरुज्जीवन हें जर ऐतिहासिक सत्य असेल
...र तें तत्कालीन ग्रंथांत अथवा मागाहून निर्माण
...ालेल्या ग्रंथांत प्रत्यक्ष किंवा निर्देशरूपानें तरी दृष्टि-
...ोचर झालें पाहिजे. श्रीहर्ष स्वतः विद्वान ग्रंथकार
...ोता हें त्यांच्या रत्नावली वगैरे नाटकांवरून दिसतें,
...आणि तो विद्वानांचा आश्रयदाता होता हें बाणाच्या
...हर्षचरितावरून निःसंदिग्ध प्रतीत होतें. तसेंच त्याज-
...द्दलचे निर्देश काव्यप्रकाश वगैरे ग्रंथांतून आढळतात.
...ीच गोष्ट भोजराजाची आहे. हेमचंद्राच्या काळीं
...ैन विद्येला मिळालेलें उत्तेजनहि स्पष्ट व संशयातीत
...आहे. सायण माधवाचार्यांच्या विषयी तर बोलावया-
...चच नको. परंतु गुप्तकाल जर सुवर्णयुग मानावयाचें
...र त्याविषयी कांहीतरी स्पष्ट आधार नको काय?
...ी कालाच्या ओघांत ग्रंथ नष्ट किंवा होतात, एवढ्या
...प्रमाणावर भरवसा ठेऊन सुवर्णयुगाच्या कल्पनेच्या-

वयाच्या? कल्पनेनें कांहीहि सिद्ध होईल. आश्रय-
दात्याचा किंवा त्याच्या काळाचा स्पष्ट निर्देश कर-
ण्याची प्रवृत्ति संस्कृत ग्रंथकारांमध्ये दिसत नाही, असें
मिराशी म्हणतात. त्यावर आम्ही बाण, बिल्हण, वाचस्पति
मिश्र, वेदांतकल्पतरुकर्ते अमलानंद यति, हेमाद्रि,
जयदेव, सायणमाधवाचार्य इत्यादि ग्रंथकारांचा नाम-
निर्देश करून विचारतों की सदरहु ग्रंथकार हे संस्कृत
ग्रंथकारच आहेत ना? आणि त्यांनी आपल्या आश्रय-
दात्याचा किंवा आपल्या काळाचा स्पष्ट निर्देश केला
आहे की नाही? की कालिदासानें तसा केला नाही
म्हणून त्यांनी देखील केला नाही असें लोकांच्या
डोळ्यांत धूळ फेकण्याकरिता ठासून सांगावयाचें?
वास्तविक ही सुवर्णयुगाची कल्पनाच निराधार आहे.
ती मॅक्समुल्लरच्या चुकीच्या समजुतीमुळे, पाश्चात्य
विद्वानांच्या भ्रांतिमूलक व्यूहरचनेमुळे आणि आपल्या
लोकांच्या तदुपजीवी वृत्तीमुळे कशी अस्तित्वांत आली
तें आम्ही आपल्या पुस्तकाच्या प्रथम भागांत सविस्तर
दाखविलें असल्यामुळे त्याची पुनरुक्ति येथे करण्याची
आवश्यकता नाही. गुप्त राजांच्या काळीं संस्कृत विद्या
नष्ट झाली होती असें कोणीहि मानीत नाही. त्या
काळांतहि कोणी ना कोणी ग्रंथकार झालेच असले
पाहिजेत असें आम्ही स्वतः म्हटलें असल्यामुळे मिरा-
शींनी तें जबरदस्तीनें आमच्या गळीं उतरविण्याचा
प्रयत्न करणें अनावश्यकच नव्हे, तर अश्लाघ्यहि होय.
वाङ्मयाप्रमाणेच कोरीव लेख, परदेशीय विद्वानांचे
लेख हेहि प्रमाणकोटींत येतात हें आम्ही त्यांचा जो
मधून मधून आपल्या पुस्तकांत उल्लेख केला आहे
त्यावरून स्पष्ट दिसण्यासारखें असतांना मिराशींनी तें
अट्टाहासानें सांगण्याची मुळीच जरूर नाही. जणूं काय
आम्ही तें मानीत ... अशा समजुतीनें त्यांनी
सांगितल्याचा भास ... अन्यत्र ... वंशाविषयी जी माहिती
मिळते ती कोरी... घरावें हा एक ...णांवरून मिळते हें
आम्ही आ...नी किंवा इतर जनां... सांगितलें आहे
(पृ. ४३). तर जग ...ास फारशी ... कोरीव लेखांत
किंवा पु...नांचा आश्रयदाता भोजरा...ही माहिती
मिळत ...दाते सिद्धराज आणि कुमारपाल... पुष्टि-
कारक ...वाचार्यांचा परामर्श घेणारे बुक्कराय...काळ हा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाङ्मयावरून सिद्ध झाला पाहिजे. पुरावा आणि निष्कर्ष हीं दोन्ही सजातीय असलीं पाहिजेत. म्हणजे जेव्हा कोठे वाङ्मयाचा ऊर्जितकाळ झाला असें आपण पाहतों तेव्हा त्या काळीं निर्माण झालेली ग्रंथसंपत्ति हीच तेथे कसोटी ठरते. त्याचप्रमाणे जेथे कोठे शिल्पकलादिकांचा विकासकाल दिसतो तेथे सुद्धा तत्कालीन शिल्पकलादिकांचे नमुने हेच प्रमाणभूत ठरतात. तेथे नुसते ग्रंथांतील उल्लेख मुळीच कामाचे नाहीत. ताजमहाल वगैरे इमारती नसत्या तर शहाजहानला Prince of builders ही पदवी कधीच प्राप्त झाली नसती. जर गुप्तकाल हें 'सुवर्णयुग' मानलें तर त्याची भरपाई नष्ट झालेल्या ग्रंथांवरून करावयाची हा कोठला शहाणपणा ! आणि नष्ट झालेले ग्रंथ सुद्धा कल्पनासृष्टींतलेच ना ! बरें, जर कांही वाङ्मय नष्ट झालें तर तें टिकण्याच्या लायकीचें नव्हतें म्हणूनच ना ! आणि असल्या शुष्क कल्पनांवर, अभावस्वरूप प्रमाणांवर, आणि सदोष तर्कपद्धतीवर उभारलेलीं अनुमानें ऐतिहासिक सिद्धांत म्हणून ग्राह्य मानावयाचे ! मग भोजप्रबंधासारखे ग्रंथ—ज्यांत कालिदास, भवभूति, बाण वगैरे कवि एककालिक व भोज राजाचे आश्रित असें वर्णन केलें आहे ते तरी ऐतिहासिक दृष्टीने अग्राह्य कां मानावे ?

श्री. मिराशी अल्बेरुणीच्या गुप्तविषयक उल्लेखाला घादांत खोटा मानतात. कारण अल्बेरुणी गुप्तांनंतर पांच शतकांनी झाला, आणि इतक्या दीर्घ कालावधींत गुप्तांविषयी खरी माहिती असणें शक्य नाही. म्हणजे थोडक्यांत निष्कर्ष असा की पांच शतकांत राजकीय कारस्थानें किंवा क्रांत्या होतात एवढेंच नव्हे, तर कीर्ति, लौकिक, सद्‌गुण ह्यांची सुद्धा एकदम उलटापालट होते। ‍ परंतु, सुवर्णयुगाचे प्रवर्तक जे गुप्तराजे त्यांचेविष‍ ग्रंथांत त‍कदम मत्सर, गैरसमज वगैरे उत्पन्न होऊ‍ आढळतो. विश्‍ोळ्या अल्बेरुणीला जसें सांगितलें ‍ व अनेक वेळां येतो, इतं‍प्रमाणे कीर्तीची उलटापालट‍ व नांवांच्या संघांचा उल्ले श्री. मिराशी यांनी घा‍आणि गण हे पर्याय शब्द असतात त्यांची कालांतरा‍ आता आमचे प्रस्तुत पुस्त होते असा दुर्लौकिक ‍ ।। नगरी'

वगैरे श्लोकांत हेंच सांगितलें आहे. सुगंधाचा लो‍ होतो, परंतु त्याचें दुर्गंधांत रूपांतर होत नाही. आणि‍ हें जर खरें तर सुवर्णयुगाच्या प्रवर्तकांनी असें का‍ लोकांचें घोडें मारलें होतें की, त्यांजविषयी लोकांन‍ मत्सर बाळगावा ? आम्ही आपल्या पुस्तकांत स्प‍ सांगितलें आहे की, अल्बेरुणीला जी माहिती मिळाल‍ ती तत्कालीन विद्वान् ब्राह्मणांकडून मिळाली. बौद्धधर्म‍ वगैरे ब्राह्मणीधर्माशीं विरोध असणाऱ्या लोकांकडू‍ मिळाली असती तर ती दूषित द्वाराने आली असल्य‍ मुळे तिच्याविषयी निदान शंका घेण्यास जागा त‍ राहती. वास्तविक तशी शंकासुद्धा घेण्याला फार‍ कारण नसतें. तथापि प्रॉटेस्टंट राजांविषयी कॅथलि‍ लेखकांनी दूषित दृष्टीने लिहिलें इतकें म्हणण्याइत‍ तरी वाव मिळतो. परंतु प्रस्तुत स्थलीं तेंहि शक्य ‍ हिंदुस्थानच्या इतिहासांत तर तशा प्रकारचें ‍ उदाहरण आढळत नाही. नाही तर अशोक‍ ब्राह्मणी वाङ्मयांत खोट्या नाट्या गोष्टी अ‍ असत्या. गुप्तराजांविषयी लोकांची उपेक्षाबुद्धि ‍ येत होती हें खास. आणि म्हणूनच तत्कालीन‍ तदुत्तरकालीन वाङ्मयांत त्यांच्याविषयी उल्लेख आ‍ ळत नाहीत. म्हणूनच त्यांना सुवर्णयुगाचे प्रवर्त‍ मानणें चुकीचें होईल. श्री. मिराशी म्हणतात ‍ त्यांचा उल्लेख वाङ्मयांत मिळत नाही म्हणून ते झाले‍ नव्हते असें म्हणणें चुकीचें होईल. अगदी शंभर ट‍ कबूल आहे. अनुल्लेख हें अभावात्मक प्रम‍ (Argumentum ex Silentio) आहे. आ‍ तें कोणत्याहि वस्तूचा किंवा व्यक्तीचा अनुल्लेखा‍ अभाव सिद्ध होत नाही एवढें फक्त दाखवण्यापु‍ उपयोजिलें जातें. परंतु कीर्ति किंवा श्रेष्ठपणा हा भा‍ रूप प्रमाणांनीच सिद्ध केला जातो. आम्ही आपल‍ पुस्तकांत गुप्तांची कीर्ति (Reputation) अ‍ शब्द योजिला आहे. जर एखाद्या राजाच्या कि‍ राणीच्या नांवाबद्दल घोटाळा असता तर ती ‍ वेगळी होती. आणि अशा प्रसंगीं कोरीव लेख‍ प्रमाण नुसत्या दंतकथेपेक्षा अधिक ग्राह्य ठरलें अस‍ परंतु कीर्ति ही व्यक्तीच्या किंवा वंशाच्या पश्चात‍ खरी जाणण्यांत येते. आणि गुप्तांची ती विशेष स‍

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीव नव्हती. यावरून ते मोठे जुलमी होते असा निष्कर्षसुद्धा निघत नाही. फाहियान हा चिनी प्रवासी त्या काळचें वर्णन देतो तें सर्व हिंदुस्थानचें देतो, आणि प्राचीन काळीं राज्यकारभाराचीं मुळें आताच्या सारखीं फार आंतपर्यंत गेलेलीं नसत. शहर, खेडीं वगैरे आपापल्या परंपरेस व जात्यादिधर्मास अनुसरून वागत असत हें तर प्रसिद्धच आहे. जर फाहियानने तत्कालीन राजघराण्याचें वर्णन दिलें असतें तर तें गुप्तविषयक मतें मानणें युक्त ठरलें असतें.

श्री. मिराशी अल्बेरुणीचा हवाला हिंदु लोकांचें कालक्रमविषयक अज्ञान व औदासिन्य हीं सिद्ध करण्याकरिता देतात. पण ही गोष्ट सर्वत्र मशहूर व सर्वसंमत असल्यामुळे दुसऱ्याच्या साक्षीची मुळीच गरज नाही. हातच्या कांकणास आरसा कशाला? परंतु कालक्रमाविषयी ते उदासीन होते किंवा कृतज्ञतेस पारखे होते, आणि म्हणूनच गुप्तांविषयी त्यांनी पोटीं परंपरा पसरविली असा जो निष्कर्ष मिराशींनी त्यावरून काढला आहे तो मात्र अगदी असंबद्ध आहे. बाण, बिल्हण, पद्मगुप्त वगैरे कवि आपापल्या आश्रयदात्याचें चरित्र कथन करतांना वर्षगणनेचा मुळीच उपयोग करीत नाहीत. 'नंतर', 'पुढे', 'कांही काळ गेल्यावर' या व असल्या शब्दांनी ते आपली गरज भागवतात. परंतु आपल्या नायकाचें ते वाजवीपेक्षा फाजील गुणवर्णन करितात; आणि त्याचा व त्याच्या वंशाचा परिमळ सर्वत्र पसरवितात. तेव्हा कालक्रमविषयक औदासिन्यामुळे सुवर्णयुगप्रवर्तक ब्राह्मणविद्योत्तेजक अशा गुप्तराजांविषयी उपेक्षाबुद्धि उत्पन्न झाली किंवा होते, आणि त्यामुळे त्यांच्या कीर्तीची अपकीर्ति झाली हें विधान किंवा अनुमान सर्वथा विसंगत आहे. जिभेला साखरेचें रूप कळत नाही म्हणून ती साखरेचें रसग्रहण करण्यासहि असमर्थ होय असा अजब सिद्धांत काढण्यासारखेंच तें हास्यास्पद आहे. श्री. मिराशींनी गुप्तपक्षाची केलेली तरफदारी पाहून आम्हाला महान ग्रंथकार व प्रतिभाशाली वक्ता एडमंड बर्क याने वॉरन हेस्टिंग्जचा बचाव वेड्यावाकड्या रीतीने करणाऱ्या त्याच्या वकिलांना जें उत्तर दिलें त्याची आठवण येते. सारशून्य समर्थनपद्धतीचें खंडन करून शेवटीं तो म्हणतो की असें बोलणें म्हणजे मनुष्यांमध्ये जी स्वाभाविक विवेकशक्ति आहे तिच्यावरच जबरदस्त आघात करण्यासारखें आहे. It is an outrage on the common sense of mankind.

गुप्तांची याप्रमाणे तरफदारी करण्याच्या भरांत श्री. मिराशी असेंच आणखी एक विपर्यस्त प्रमाण देतात. स्कंदगुप्ताच्या प्रशस्तिपर जो श्लोक त्यांनी दिला आहे तो व तशा प्रकारचे श्लोक हे त्या त्या राजांच्या कारकिर्दीत व त्यांच्या प्रेरणेने किंवा त्यांच्या संतोषा-साठीच लिहिले किंवा कोरले गेले असल्यामुळे अत्यंत सावधगिरीनेच घेतले पाहिजेत. 'तस्मिनृपे शासति नैव कश्चित्' हा श्लोक शाकुंतलाच्या 'महाभागः कामं नरपतिरभिन्नस्थितिरहो' ह्या श्लोकाशीं अर्थतः समांतर आहे की नाही हें त्यांनीच पाहावें. रामायणांत अनरण्य नामक सूर्यवंशी राजाचें असेंच हुबेहुब वर्णन आहे. छांदोग्योपनिषदांतील 'न मे स्तेनो जनपदे न कदर्यो न मद्यपो' हें वर्णन मिराशींस आठवतें काय! अशीं मामुली वर्णनें फारशी जमेस धरतां येत नाहीत आणि स्वतःचें अशा तऱ्हेने वर्णन देऊन आपली कीर्ति पसरविणारे राजेच कोरीव लेखांतून आढळतात. ज्या कोरीव लेखांवर सर्व भर देऊन मिराशी गुप्तांविषयी अनुमानें काढतात त्या लेखांचा तारतम्यानेच विचार केला पाहिजे. त्यांमध्ये जी वंशावळी वगैरे दिलेली असते ती शंभर टक्के खरी असते व तशी ती मान-ण्यांतहि येते. जें पराक्रमाचें वर्णन अथवा दिग्विजया-सारखें वर्णन आढळतें तें थोडेंफार प्राचीन परंपरेच्या धर्तीवर असल्यामुळे सावधगिरीनेच घेतलें पाहिजे, मग तें काव्यांत असो, किंवा कोरीव लेखांत असो. आणि जें वर्णन केवळ स्वतःचा गौरव वाढविण्यासाठी स्तंभावर किंवा अन्यत्र खोदून ठेवलेलें आढळतें तें अंशांनी ग्राह्य धरावें हा एक विचारणीय प्रश्न आहे. कोणी राजांनी किंवा इतर जनांनी स्वतःचा महिमा गायिला तर जग त्यास फारशी किंमत देत नाही. विद्वज्जनांचा आश्रयदाता भोजराजा, हेमचंद्राचे आश्रयदाते सिद्धराज आणि कुमारपाल, आणि सायण-माधवाचार्यांचा परामर्श घेणारे बुक्कराय व हरिहर हा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व इतर राजांची कीर्ति त्यांनी खोदविलेल्या शिलालेखांवर प्रतिष्ठित नाही. श्री. मिराशींनी 'स्तुवन्ति श्रान्तास्याः क्षितिपतिमभूतैरपि गुणैः हा मुद्राराक्षसांतील श्लोक, आणि बाणाच्या कादंबरीतील शुकनासाचा चंद्रापीडाला उपदेश वगैरे जर नीट ध्यानांत घेतलें तर त्यांना आढळून येईल की, राजे लोकांची तत्कालीन स्तुतिपाठकांनी केलेली स्तुति ही प्रायः अर्थवादात्मक असल्यामुळे तिची किंमत फार अल्प असते. शिवाय सामान्य व्यवहारज्ञान आपणांस सतत ग्वाही देतें की जे स्वतःची थोरवी आपल्याच तोंडाने गातात त्यांची थोरवी दुसरे गात नाहीत, आणि ज्यांची थोरवी दुसरे गातात ते स्वतः त्या भानगडींत पडत नाहीत. गुप्तांचा मोठेपणा, सर्व इतिहास, हा कोरीव लेख वगैरे प्रमाणांवरूनच उपलब्ध झालेला आहे असें आम्हीच आपल्या पुस्तकांत म्हटलें आहे. शिलालेखांसारख्या साधनांवरूनच जर कोणाची योग्यता ठरवावयाची असेल तर बेताबाताच्या प्रदेशांवर राज्य करणारे राजे 'अखिलभूमंडलचक्रवर्ती' भासतील, कांही यथाशक्ति दान करणारे कर्णाला मागे टाकणारे दिसतील, आणि बरेचसे राजे, ज्यांचें नांवहि संस्कृत-प्राकृत वाङ्मयांत आढळत नाही असे, 'कविवर,' 'पंडितप्रवर' वगैरे वाग्भूषणांनी मंडित झालेले आढळतील. आणि तें जर खरें मानलें तर भोपाळच्या तलावांतील मोठा मासा देवमाशाची बरोबरी करतो असें कोणी म्हटलें तर तें देखील खरें मानावें लागेल. गुप्तांनीं लोकांचा अनन्वित छळ केला असें आम्ही कोठेहि म्हटलेलें नाही, किंवा ध्वनितहि केलेलें नाही; मग मिराशींनी तें कां गृहीत धरून बोलावें हें समजणें कठीण आहे. ज्या अर्थी तत्कालीन ग्रंथकारांची त्यांजविषयी उपेक्षाबुद्धि दिसते, ज्या अर्थी अल्बेरुणी त्यांजबद्दलची माहिती देतांना ते 'दुष्ट लोक होते' असें देतो, ज्या अर्थी त्याची माहिती दूषित द्वाराने आलेली नाही, त्या अर्थी त्यांची कीर्ति मुळीच स्पृहणीय नव्हती हें खास. आणि ते सर्वच तशा प्रकारचे असतील हेंहि फारसें संभवत नाही असेहि आमचे उद्गार आहेत. श्री. मिराशी व्हिन्सेंट स्मिथचें मत द्वितीय चंद्रगुप्ताच्या राज्यकारभाराविषयी त्याच्याच शब्दांत देऊन तें प्रमाण म्हणून म्हणतात. परंतु तोच प्रसिद्ध इतिहासकार त्याच चंद्रगुप्त-विक्रमादित्याच्या पूर्वी, अर्थात इसवी सनापूर्वी पहिल्या शतकांत-विक्रमादित्य नामक हिंदु आख्यायिकांना आधारभूत असलेला राजा उज्जयिनींत होऊन गेला असण्याचा संभव आहे असेंहि अन्यत्र आपलें मत देतो ही एक गोष्ट; आणि प्रो. फ्रँकलिन एडगर्टन त्याशीं सहमत आहेत ही दुसरी गोष्ट आम्ही आपल्या पुस्तकांत व्यवस्थितपणे दिली आहे (पृ. ४३). असें असल्यामुळे मिराशींनी प्रमाणभूत म्हणून दिलेले व्हिन्सेंट स्मिथचें मत शंभर टक्के निकामी होऊन हवेंत विरून जातें. आम्ही ग्रंथकाराचें नांव, पुस्तकाचें नांव, आणि पृष्ठक्रमांक हीं सर्व दिलीं आहेत.

गुप्तकालीं संस्कृत विद्या रोडावली होती असें आम्ही कधीच म्हटलेलें नाही. तशी स्थिति तत्पूर्वी किंवा त्यानंतर केव्हाहि नव्हती असेंच आम्ही स्पष्ट प्रतिपादन केलें आहे. तेव्हा गुप्तकालीं पूर्वीप्रमाणेच व्यवस्था चालत आली होती. ज्यांच्या पावलावर पाऊल टाकून मिराशी गुप्तांपूर्वी संस्कृत विद्येस ऱ्हास लागला होता व त्यांचे कालीं संस्कृताचें पुनरुज्जीवन झालें असें मानतात, त्या युरोपियन पंडितांचें मत कसें भ्रममूलक आहे हें आम्ही आपल्या पुस्तकाच्या प्रथम परिच्छेदांत सविस्तर दर्शविलें असल्यामुळे येथे त्याची पुनरुक्ति करणें व्यर्थ होईल. गुप्तकालीं संस्कृत विद्येचा प्रचार होता याविषयीं मुळीच वाद नाही. फार काय पण महायान बौद्धमताचे व जैन पंडितांचे तत्त्वज्ञानविषयक ग्रंथहि संस्कृतांतच गुप्तांपूर्वीहि होऊं लागले होते असें नागार्जुनादिकांच्या ग्रंथरचनेवरून दिसतें. नुसता प्रचार असणें वेगळें, आणि एकदम प्रचंड आंदोलन होऊन उत्कर्षाची श्रेष्ठ पायरी गाठणें वेगळें. आणि मिराशींचे लक्षांत हाच भेद आलेला दिसत नाही. दक्षिणेंत सातवाहनांचे कालापासून प्राकृता विशेष उत्तेजन होतें, आणि उत्तरेंत त्याचप्रमाणे संस्कृत भाषेस होतें ह्याविषयी आम्ही आपल्या पुस्तकांत विवेचन केलेलें आहे. इतकेंच नव्हे, तर उत्तर व दक्षिण यांजमध्ये कशी चुरस असे तेंहि व्यवस्थितपणे दाखविलें आहे.

१४

'केऽभूवन्नाढयराजस्यकाले प्राकृतभाषिणः ।
काले श्रीसाहसांकस्य के न संस्कृतभाषिणः ॥'

हा श्लोक सातवाहनांच्या काळीं प्राकृत भाषेस, आणि ाहसांक राजाच्या काळीं संस्कृत भाषेस फार उत्तेजन ोतें असें स्पष्ट दर्शवितो. आढयराज म्हणजे हाल, ऊर्फ सातवाहन; आणि साहसांक म्हणजे विक्रमादित्य असें टीकाकारांचें म्हणणें आहे; आमचें अनुमान नव्हे. आणि ज्या अर्थीं परमारवंशीय मुंज राजाचें दुसरें नांव नवसाहसांक असें पद्मगुप्तप्रणीत नवसाहसांकचरितावरून ..ष्ट दिसतें त्या अर्थीं जुना साहसांक राजा विक्रमादित्य हाच असावा, आणि तोहि परमारवंशीयच असला पाहिजे असें सिद्ध होतें. कारण माधवराव पेशव्यांची कीर्ति स्पृहणीय असल्यामुळे दुसरा सवाई माधवराव हें नांव अस्तित्वांत आलें हें निदान महाराष्ट्रीय वाचकांस तरी सांगण्याची जरूर नाही. आणि साहसांक व विषमशील (तथां विषमशीलश्च नाम्ना वैषम्यतो-ऽरिषु) हीं दोन्ही नांवें अगदी समानार्थक असल्यामुळे मध्यंतरीं कांही काळ लुप्त झालेला परमारवंश अवंति ऊर्फ मालव देशांत प्राचीन कालापासून चालत आलेला दिसतो; आणि त्यामुळेच पद्मगुप्ताने प्राचीन विक्रमादित्याच्या उज्जयिनीचें व परमारराज्यलक्ष्मीचें वर्णन आपले काव्यांत प्रारंभीं केलें आहे. जर गुप्तवंशीय राजा चंद्र हाच पहिला विक्रमादित्य असें मिराशींचे आग्रहामुळे मानलें तर संस्कृत विद्येचे व कवींचे आश्रयदाते मुंज व भोज हे दोन विख्यात राजे त्या विक्रमादित्यास परमारवंशीय कल्पून आपणास त्याचे वंशज मानण्याइतके हीनवृत्तीचे झाले होते असें समजावयाचें की काय ! आणि तसें समजणें योग्य नसेल तर प्रथम व प्राचीन विक्रमादित्य हा परमारवंशीय, परमशैव, कीर्तिमान, बौद्धधर्माचा छळ न करतांहि वैदिक होय र्माचा पुरस्कर्ता, कवींचा व विद्वानांचा आश्रयदाता हार णि शकारि या संज्ञेस पात्र असा होऊन गेल्यामुळेच केलं भोजादिकांना स्पृहणीय स्फूर्तिस्थान असा झाला ष सला पाहिजे हें आम्ही तृतीय परिच्छेदांत विवेचिलें हेरि हे. येथे त्याची पुनरुक्ति करण्याची गरज नाही.

फक्त मिराशींच्या कांही विधानांचें व आक्षेपांचें खंडन करणें भाग आहे.

श्री. मिराशी जो पुरावा आपल्या कल्पनेविरुद्ध असेल तो एकदम प्रक्षिप्त म्हणून सांगतात. कथासरित्सागरांतला शेवटचा समग्र लंबक विषमशील या संज्ञेने प्रसिद्ध आहे. बृहत्कथामंजरीमध्येहि तो तसाच आहे. बृहत्कथाश्लोकसंग्रह हा अपूर्ण असल्यामुळे त्यावरून कांही निष्पन्न होत नाही. सबंध लंबक प्रक्षिप्त म्हणून कल्पना केली तर मूळ ग्रंथ सतरा लंबकांचा असून अठरावा लंबक मागाहून कोणी तरी घुसडला असावा असें अगदी निर्मूळ अनुमान ओघाने प्राप्त होतें. परंतु सोमदेवाने 'यथामूलं तथैवैतत्' असें प्रतिज्ञेवर सांगितलें आहे. आणि मिराशींना स्वतःच्या नापसंतीशिवाय त्याजविरुद्ध पुरावा देतां येणें शक्य नाही. स्वतःची पसंती किंवा नापसंती ही कोणत्याहि प्रमाणकोटींत बसत नाही. शिवाय, कोणत्याहि ग्रंथांतला कोणताहि भाग प्रक्षिप्त असें केव्हा समजलें जातें? तर जेव्हा कालविपर्यय (anachronism) वगैरे विसंवादी संदर्भ त्यामध्ये स्पष्ट आढळतात तेव्हा. परंतु सातवाहन राजाच्या काळीं होऊन गेलेल्या गुणाढ्याने स्वतःपूर्वी सुमारें सव्वाशें वर्षे पूर्वी होऊन गेलेल्या विषमशील उर्फ विक्रमादित्याची माहिती शेवटच्या भागांत ग्रथित करणें हें विसंवादी तर नाहीच, पण सर्वतोपरी योग्य व सुसंभाव्य दिसतें. आणि शिवाय त्या राजाचें नांव साहसांक असेंहि असावें हें पूर्वींच्या विवेचनावरून दिसून येईल. कल्हणाला 'शकारि' विक्रमादित्य म्हणून जो माहित आहे तो चंद्रगुप्ताच्या पूर्वींचा निःसंशय आहे; आणि आमच्याशिवाय कै. चिं. वि. वैद्यांनीहि त्याजविषयी आमच्याप्रमाणेच मत प्रदर्शित केलें आहे. अबुल फजलने माळव्याच्या प्राचीन राजावळीविषयी जी माहिती ऐने-अकबरीमध्ये दिली आहे. ती सुद्धा त्याच्या वेळीं उपलब्ध असलेल्या राजपुतांच्या ऐतिहासिक लेखांवरून दिली आहे, कथासरित्सागरात विक्र खास नव्हे. मग गुणाढ्य, कल्हण, अबुल फजल असल्य सर्व लेखकांचा प्राचीन परंपरेशीं सर्वथा समन्वय आम होत असतां तो झुगारून देऊन युरोपियन पं असल्या भारतीय प्राचीनतेच्या विरुद्ध विक्षिप्त नाही ना

विपर्यस्त अनुमानें आणि बोजड प्रमाणें हीं खरीं धरून त्यांच्या परंपरेस भलतेंच महत्त्व देणाऱ्या मिराशींची पसंती अथवा नापसंती लक्षांत घेण्याचें कारण दिसत नाही. त्याचप्रमाणे जेव्हा कोणत्याहि मुख्य सिद्धांता-विरुद्ध आक्षेप किंवा शंका घेतली जाते तेव्हा त्या सिद्धांतावरून काढलेले उपसिद्धांत किंवा अनुमानें त्याचें समर्थन करण्यास अपात्र ठरतात, ही गोष्ट मिराशींच्या ध्यानांत आलेली दिसत नाही. जर उन्हाळ्यामध्ये वाळवंटांत दृश्यमान होणारा जलाशय खरा की खोटा अशी शंका आली तर त्याजवरील लाटा आणि त्यांतील प्रतिबिंबें त्याचें सत्यत्व सिद्ध करूं शकणार नाहीत. चंद्रगुप्त–विक्रमादित्याहून भिन्न आणि तत्पूर्वकालीन विक्रमादित्य झाला की नाही हा वादाचा विषय असतां तो झाला नाही असें ठाम गृहीत धरून त्या कल्पनेचे अनुरोधानें कथासरित्सागराचा शेवटचा लेखक, कल्हणाचे निर्देश, अबुल फजल वगैरेंनी दिलेली माहिती अग्राह्य ठरविणें म्हणजे स्वतःच्या मताला स्वतःच्या पसंतीचें शिक्कामोर्तब करण्यासारखेंच होय. प्रसिद्ध इतिहासकार फिरिश्टा किती वर्षें मागाहून झाला हा प्रश्न नसून त्याने माहिती कोठून मिळविली हा महत्त्वाचा मुद्दा आहे. आणि त्याने आपले ग्रंथारंभीं किती पूर्वीचे इतिहास अभ्यासिले होते त्यांची यादी व्यवस्थित दिली आहे.

शकारि विक्रमादित्य परमारवंशीय होता हें आम्ही पद्मगुप्तप्रणीत नवसाहसांकचरित, मुंजभोजादिकांचा तद्विषयक अभिमान, अबुल फझलने दिलेली वंशावळी वगैरे प्रमाणांवरून ठरविलें आहे. आणि 'नन्दान्तं क्षत्रियकुलम्', 'अतः परं शूद्राः पृथिवीं भोक्ष्यन्ति' हीं पुराण वचनें गुप्तांचे विरुद्ध जातात, आणि अबू पर्वतावर आग्निकुंडांतून प्रादुर्भूत झालेले जे चार असे वंश त्यांमध्ये गुप्तवंशाचा अंतर्भाव नसून परमारांचा आले हें प्रमाण त्यांतील अद्‍भुत कथा सोडून देऊन— णीय ...षयी ब्राह्मणांची उपेक्षा बुद्धि, व परमारादिकां-असतील हे ...दरबुद्धि स्पष्टपणें दर्शवितात. आणि तशी उद्गार आहेत असण्याचें कारण तेथे व कथासरित्सागरांतहि चंद्रगुप्ताच्य ...लें आहे. बौद्धादि पाखंडमतांचें उच्चाटन ...च्छसंघांचा उच्छेद हें इष्ट कार्य असल्यामुळे ज्या राजवंशांनी ब्राह्मण्याचा पुरस्कार करून त्या कार्यांत मदत केली व तें सिद्धीस नेलें त्यांचा, अर्थातच, ब्राम्हणांनी उदोउदो केला व इतरांविषयी उपेक्षाबुद्धि बाळगली. याप्रमाणे अन्वयव्यतिरेकाने सर्व उपपत्ति स्वच्छपणें लागत असतां मिराशींनी गुप्तांची केलेली वकिली फोल ठरते. सुवर्णयुगाचे प्रवर्तक आणि ब्राह्मणी विद्येचे पुरस्कर्ते म्हणून ज्यांचा महिमा भक्तिभावाने गावयाचा त्यांजविषयी संस्कृत वाङ्मयांत उपेक्षाबुद्धि कां दिसून येते, असा प्रश्न केल्यास त्यावर मिराशींचें उत्तर काय? तर, संस्कृत वाङ्मयाचा लोप झाला असावा हें अनुमान; ब्राह्मणांनी आपल्या पुरस्कर्त्यांची दुष्कीर्ति पसरविली व अल्बेरुणी-सारख्या परक्या इसमासहि ती सांगितली ही अजब कल्पना; आणि चालुक्य–परमारादिकांविषयी अवडंबर माजवून गुप्तांस मुद्दाम त्यांतून गाळलें ही साळसूद उपपत्ति! बर्कच्या पूर्वोक्त शब्दांची अशा प्रसंगीं आठवण येणें अपरिहार्य आहे.

गाथासप्तशतींत फेरफार कदाचित करण्यांत आले असें मानलें तथापि ज्यांत विक्रमादित्याचा निर्देश आढळतो तो श्लोक प्रक्षिप्त हें कशावरून ठरवावयाचें? तर त्या नांवाचा राजा चन्द्रगुप्तापूर्वी झाला नाही ह्या गृहीत कल्पनेवरूनच ना! मूळ सिद्धांतच सर्वमान्य किंवा संशयातीत नसल्याने ही प्रक्षिप्तत्वाची कल्पनाहि असिद्ध ठरते. तसें सिद्ध करावयाचें असेल तर गृहीत कल्पनेच्या व्यतिरिक्त अशा पुराव्याने तें करावें लागेल. नाही तर एखाद्या ग्रंथांत कांही कुठे प्रक्षिप्त भाग आहे म्हणून आपणास बाधक असलेला पुरावा तेवढ्या कारणामुळे प्रक्षिप्त ठरणार नाही. 'स मैत्रातनयः श्यामः। मैत्रातनयत्वात्। परिदृश्यमान मैत्रातनयस्तोमवत्।' ह्या अनुमानाप्रमाणे तो हेत्वाभास ठरतो.

माळव्याचें प्राचीन नांव अवंति होतें हें सर्वमान्य आहे. आम्हीहि तें नांव, व कोंकण प्रांताचें अपरांत असें प्राचीन नांव कालिदासाच्या ग्रंथांतून मिळतें, मालव आणि कोंकण हीं नांवें आढळत नाहीत, म्हणून कालिदासाचें जा... ...त्व सिद्ध होतें असें मानलें आहे.

मानतों. 'मालवानां गणस्थित्या' वगैरे उल्लेख पांचव्या शतकांतील असल्यामुळे ते त्या वेळीं प्रचलित असले-ल्या नांवांवरून केले गेले असावे असेंच धरलें आहे. मग हें प्रमाण आमच्या विरुद्ध फेकण्यांत हाशील काय ! त्या वर्षगणनापद्धतीला मालवसंवत म्हणूं लागले असें आम्ही कोठेंहि म्हटलेलें नाही. 'गौडे शाके' नुसतें 'शाके' वगैरे शब्दप्रयोग संस्कृत प्राकृतांतून सर्वत्र आढळतात त्याचप्रमाणे हाहि कालगणतेचा अस्पष्ट निर्देश आहे.

'गण' आणि 'संघ' या दोन शब्दांविषयी आम्ही सविस्तर विवेचन आमच्या 'विक्रमद्विसहस्राब्दीच्या खंडांत, त्याचप्रमाणे आमच्या प्रस्तुत पुस्तकांतील द्वितीय परिच्छेदांत सविस्तर केलें असल्यामुळे येथे त्याची पुनरुक्ति करण्याची गरज नाही. 'संघ' किंवा 'गण' म्हणजे लोकसत्ताक राज्य नसून समान जमातींचा गट (Confederacy) असें पाणिनीय सूत्रांवरून, कौटिलीय अर्थशास्त्रांतील 'राजशब्दोपजीविनः संघाः' वगैरे प्रयोगांवरून, महाभारतांतील 'गणानुत्सवसंकेता-नजयत्सप्तपाण्डवाः' या निर्देशावरून, भट्टोत्पलाने 'गणराज्य कृष्णवेल्लूर' हीं राजांचींच नांवें आहेत असें शके ८८८ मध्ये लिहिलेल्या टीकेंत स्पष्ट सांगितल्यावरून (गणराज्य कृष्णवेल्लूरा राजानः), व आणखी दुसऱ्या प्रमाणांवरून ठरविलें आहे. नाही तर 'पञ्चकः संघः' 'अष्टकः संघः' हे शब्द पांच लोक असलेलें, आठ लोक असलेलें, रिपब्लिक (!) अशासारख्या वेडगळ अर्थांचे वाचक होतील. पांच जमातींचा गट, आठ मांडलिकांचा गट असाच अर्थ सर्व संदर्भांवरून कसा जमतो तेंहि सप्रमाण दाखविलें आहे. ग्रीक व रोमन लोक आपलींच नांवें कशीं परदेशांतील देवांना अथवा संस्थांना बेला-शक लावीत तेंहि आम्ही तेथे गिबनचा आधार देऊन दाखविलें आहे. हरीला 'हेराक्लीज' सूर्यवंशी राजांच्या मूळ पुरुषाला 'डायोनिसस' वगैरे नांवें देण्यांत ग्रीक इतिहासकारांची तीच प्रवृत्ति दिसून येते.

'मालवानां गणस्थित्या' म्हणजे 'मालव देशांतील गणनापद्धतीप्रमाणे' हाच अर्थ जास्त ग्राह्य असून 'मालव लोकांनी आपलें गणराज्य. म्हणजे रिपब्लिक स्थापलें तेथपासून' असा अर्थ काढण्यांत [illegible] पण होते व अध्याहार घ्यावा लागतो हें केव्हाहि विसरून चालणार नाही. जर श्री. मिराशींना, शब्दांचा अर्थ करतांना शक्य तों अध्याहार न घेतां सरळपणानेच अर्थ करणें योग्य आहे हा शाबरभाष्यांत प्रारंभींच दिलेला सिद्धान्त माहीत असेल तर सरळ अर्थ कोणता आणि वाकडा कोणता हें त्यांच्या ध्यानीं येईल. 'लोके येष्वर्थेषु प्रसिद्धानि पदानि तानि सति संभवे तदर्थान्येव सूत्रे-ष्विति अवगन्तव्यम् । नैषामध्याहारादिभिः परिकल्पनी-योऽर्थः, परिभाषितव्यो वा ।' ह्या जगन्मान्य सिद्धांताचें तत्त्व कीलहॉर्नच्या लक्षांत आल्यामुळे, त्याने फ्लीटच्या वर दिलेला अर्थ आपणास संमत नसल्याचें, आणि गण शब्दाचा अर्थ गणना असाच त्या ठिकाणीं कसा समंजस ठरतो तें स्पष्ट शब्दांत दाखविण्याचें धैर्य दाखविलें आहे. आणि आम्ही त्याचे शब्द आमच्या पुस्तकांत जसेच्या तसे उद्धृत केले आहेत (पृ. ३३).

कथासरित्सागरांतील विक्रमादित्याच्या कथेचा कोरीव लेखांतील पुराव्यांशीं विरोध येतो असें मिराशी म्हणतात. कारण काय, तर "ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत उज्जयिनीस शकांचें राज्य होतें." संवतकर्त्या विषमशील उर्फ साहसांक राजाला 'शकारि' अशी संज्ञा मिळाली असें कल्हण मानतो आणि ज्याच्या आयुष्यांतील मुख्य कार्य म्लेच्छसंघांचें उच्चाटन करणें हें होतें असें प्रत्यक्ष कथासरित्सागरावरूनच सिद्ध होतें, त्या राजाच्या लहानपणीं व त्याच्या बापाच्या कारकिर्दींत जर शकांचें राज्य त्या प्रांतात किंवा त्याच्या आसपास नसेल तर तो उच्छेद तरी कोणाचा करणार ? ज्या बौद्धमताचें शंकरा-चार्यांनी खंडन केलें त्याच्या पूर्वी व त्यांच्या लहानपणीं बौद्धमत पसरलेलें होतें हें उघड आहे. महाराष्ट्रांत सतराव्या शतकांत विजापुरकरांचें राज्य होतें म्हणून शिवाजी त्या काळीं झाला नसला पाहिजे असें म्हणण्या-इतकेंच हें असंबद्ध होय.

कालिदासाचा कालनिर्णय सर्वस्वी विक्रम दित्याच्या कालनिर्णयानुसार अवलंबून असल्याने आणि आम्ही त्या विषयाचा उपन्यास आमच्या पुस्तकांतील शेवटच्या परिच्छेदांत केला असल्यामुळे येथे त्या जास्त चर्चा करण्याचें कारण नाही. तथापि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांनी आमच्या मुद्द्यांवर जे आक्षेप घेतले आहेत त्यांचा विचार करणें क्रमप्राप्त आहे. वत्सराज उदयन आणि कालिदास यांजमधील अंतर चार पांचशें वर्षांपेक्षा जास्त नसावें; कारण, तोंडी आख्यायिका त्याहून जास्त काळ फारशा टिकत नाहीत. हें प्रमाण निर्णायक नसून, अर्थातच, पुष्टिकारक आहे. श्री. मिराशी त्यावर म्हणतात की तापस वत्सराज हें नाटक इ. स. आठव्या शतकांत लिहिलें आहे. मेघदूतांतील शब्दप्रयोग जर त्यांनी नीट लक्षांत घेतला असता तर असा आक्षेप घेतला नसता. 'प्राप्यावन्तीनुदयनकथाकोविदग्रामवृद्धान् ।' यामध्ये ग्रामवृद्ध असा शब्द आहे. म्हणजे कालिदासाच्या काळीं अवन्ति देशांतील—नुसत्या उज्जयिनींतील नव्हत—वृद्ध जन उदयनकथेंत निपुण असल्याचा उल्लेख आहे. अर्थात, परंपरेने चालत आलेल्या तोंडी आख्यायिका या ठिकाणीं विवक्षित आहेत. एकदा ग्रंथांत संगृहीत झालेल्या कथा वृद्धांनाच माहीत नसून विद्वानांना व इतरांनाहि त्यांच्याद्वारें परिचित होतात. आज उदयनकथेवर एकदा सिनेमा निघाला म्हणून आज ती अव्याहत तोंडी परंपरा चालत आली आहे असें म्हणतां येणार नाही. भोजराजाविषयी किंवा पृथ्वीराज चौहानाविषयी तोंडी कथा प्रचलित नाहीत. अकबर, शिवाजीविषयी आहेत, एवढें सांगितलें म्हणजे पुरे.

विक्रमादित्य, महेंद्रादित्य अशीं नांवें गुप्तराजांनी धारण केलेलीं असून तीं त्यांचीं मूळचीं नव्हतीं हें सर्वमान्य आहे. जे दुसरीं नांवें धारण करतात ते पूर्वीच्या प्रसिद्ध राजांचीं नांवें धारण करतात हें प्रसिद्ध आहे. पहिल्या अकबरानंतर व शिवाजीनंतर किती अकबर व शिवाजी काजव्याप्रमाणे लुकलुकतात तें पाहिलें म्हणजे पहिल्यांच्या खऱ्या योग्यतेची खात्री पटते. याविषयी सविस्तर विचार आमच्या पुस्तकांत केला आहे.

गुप्त राजे प्रायः विष्णूपासक होते एवढ्यावरून त्यांनी शैवांचा किंवा इतरांचाहि द्वेष केला असें मुळीच संभवत नाही. कारण हिंदु लोकांची तशी वृत्ति कधीच नव्हती. परंतु उज्जयिनींतील अत्यंत प्राचीन, प्रसिद्ध, आणि फिरिश्ता वर्णन करतो त्याप्रमाणे अतिभव्य देऊळ कोणी तरी राजानेच बांधलें असलें पाहिजे. आणि जर तें विक्रमादित्याने बांधलें होतें व त्याचा पुतळाहि तेथे होता असें तो मुसलमान इतिहासकार पूर्वीच्या मुसलमानांनीं इतिहासाच्या आधारें म्हणतो—ऐकीव माहितीवरून नव्हे—तर तो विक्रमादित्य कथासरित्सागरांत ज्याचें वर्णन आहे तोच शंभर टक्के जमतो. नामधारी गुप्त राजे जमत नाहीत. विषमशील विक्रमादित्य माल्यवान नामक शिवगणाचा अवतार होता हें वर्णन चंद्रगुप्ताला कधीहि लागू पडणार नाही. मग त्यामध्ये कवित्वाचा अंश कितीहि असो.

अश्वघोषाचे ग्रंथांचा सर्वत्र प्रचार होता हें म्हणणें जरा विचित्रच वाटतें. कारण तो राजशेखरासारख्या एकाद-दुसऱ्या आलंकारिकाला माहीत असला तरी दण्डी, वामन, आनंदवर्धन, मम्मट, उद्भट वगैरे इतर प्रसिद्ध ग्रंथकारांना माहीत असल्याचें नजरेस येत नाही. बाणासहि तो फारसा परिचित नसावा असेंच दिसतें. जर माघकवीच्या काव्यांतील किंवा दुसऱ्यांच्या ग्रंथांतील उदाहरणें सगळीकडे आढळतात आणि अश्वघोषाच्या ग्रंथांतील केवळ एकाद दुसऱ्या ठिकाणीं आढळतात. तर त्यावरून काय अनुमान निघतें ?

कालिदासाप्रमाणे अश्वघोषांतहि अपाणिनीय प्रयोग आढळतात, किंबहुना जास्तच आढळतात, असें श्री. मिराशी म्हणतात. परंतु अश्वघोष हा कवित्वाच्या स्फूर्तीपेक्षा धार्मिक भावनेनेच जास्त प्रेरित असल्यामुळे त्याचें भाषेवर तितकें प्रभुत्व दिसत नाही, आणि शिवाय असे कवि प्रायः अनुकरणप्रियच असतात असें आम्ही अन्यत्र प्रतिपादन केलें आहे. शिवाय, बौद्ध ग्रंथकार अपाणिनीय शब्द कसे वापरीत हें श्री. मिराशींनी 'सर्वथानुपपत्तेश्च ।' (वे. वे. सू. २।२।३२) ह्या सूत्रावरील भामती व कल्पतरूंतील खुलासा पाहिल्यास त्यांचे लक्षांत येईल. दुसरे सामान्य लेखक—कवि किंवा ग्रंथकार ह्या संज्ञेस पात्र नसलेले—अपप्रयोग करण्याविषयी दुर्विख्यात आहेत. 'पुष्पाणि प्रतिगृह्यताम्,' 'परित्यक्त्वा देवान्' इत्यादि [illegible] कविकालावर उजेड पाडूं शक[illegible]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कोरीव लेखांतील संस्कृत त्याचप्रकारचें मग तें कोणत्याहि काळांतील असो.

प्रमाणे श्री. मिराशींच्या मुख्य आक्षेपांचा जितका जरूर तितका केला. ‘कृशार्थानकृशांश्च... च कृशांस्तथा’ ह्या महाभारतांतील श्लोकाप्रमाणे कांही महत्त्वाच्या मुद्यांकडे दुर्लक्ष, व कांही क्षुल्लक भलतेंच महत्त्व कसें दिलें आहे तें वाचकांचे वरील विवेचनावरून आल्याशिवाय रहाणार साम्यदर्शन (analogy) ह्या प्रमाणाकडे त्यांनी डोळेझाक केली आहे तें रोमन व इंग्लिश वाङ्मकडे नजर ओझरती फेकल्यास दिसून येईल. आगस्टस रोमन बादशहाचे कारकिर्दीत लॅटिन वाङ्मयाला तेजकळा चढली म्हणून ‘आगस्टन’ (Augusm) कालखंड प्रसिद्ध आहे. आणि त्याची साक्ष किंवा बिंब तत्कालीन ग्रन्थसंपत्तींत स्पष्ट दिसून येतें; पांपेई च्या गेल्या शतकांतील उत्खननांतील अवशेषांवरून सिद्ध करावें लागत नाही. त्याचप्रमाणे पहिल्या एलिझाबेथ राणीच्या कारकिर्दीत इंग्लिश वाङ्मयाचा उत्कर्ष झाला असें आढळतें. म्हणून ‘एलिझाबेथन’ असें अन्वर्थक नांव तत्कालीन वाङ्मयास मिळालें. आजच्या म्हणजे दुसऱ्या एलिझाबेथचे कारकीर्दीत इंग्लंड जास्त समृद्ध किंवा सुखी असलें तरी पूर्वीच्या सारखी ग्रंथसंपत्ति निर्माण होण्याची आशा नाही. जर ‘बाहेववचनप्रामाण्यात्’ चालत आलेली परंपरा नीट पारखून पाहिली, आणि बुद्धीला ‘अनुवाकहतत्वा’मुळे चढलेलीं पुटें पुसून काढलीं, तर पूर्वीचे सर्व ग्रह नाहीसे होऊन ‘सुवर्णकाळ’ (अर्थात वाङ्मयाचा) कल्पावयाचाच झाल्यास तो इ. स. ६००–१००० पर्यंत मानणेंच युक्त होईल. कारण ह्या कालखंडांत बाण, सुबन्धु, माघ, श्रीहर्ष, मयूर, भवभूति इत्यादि कवि; दण्डी, भामह, वामन, आनन्दवर्धन, अभिनवगुप्त, मम्मट वगैरे अलंकारशास्त्र निर्माण करणारे प्रतिभाशाली ग्रंथकार; प्रभाकर, कुमारिलभट्ट, मण्डनमिश्र वगैरे श्रेष्ठ मीमांसक; शंकराचार्यांसारखे अद्वितीय वेदान्ती—ज्यांच्याविषयी लिहितांना आमचे दिवंगत मित्र के. टी. शहा ह्यांनी “A prodigy, if ever there was one” असे उद्गार काढले आहेत ते; वाचस्पति मिश्रांसारखे न्याय–सांख्य–वेदान्तावर सर्वमान्य ग्रंथ करणारे शास्त्रज्ञ हे व दुसरे पुष्कळ झालेले आढळतात. त्याचप्रमाणे ब्राह्मणी विद्याकलादिकांचा उत्कर्षकाल, आणि बौद्धमताचा अपकर्षकाळहि हाच. आणि ह्युएन्त्संगचे पुस्तकावरून लोकहि त्या काळीं सुखी होते ह्याविषयीं शंका नाही. उपरिनिर्दिष्ट कवि आणि ग्रंथकार त्याच काळांत होऊन गेले हें निःसंदिग्ध व अतएव सर्वसंमत आहे. भास, कालिदास, भारवि वगैरे गुप्तकालापूर्वी होऊन गेले असावे असें मानणारा एक मोठा पक्ष आहे; पण बाणादिक गुप्तकालानंतरच झालेले ह्याविषयीं दुमत नाही. असें असतांना गुप्तकाल म्हणजे संस्कृत विद्येच्या पुनरुज्जीवनाचा काळ किंवा ‘सुवर्णयुग’ ही कल्पना कितपत ग्राह्य आहे तें इतिहासरसिकांनी मनन करून ठरवावें. बुद्धिस्वातंत्र्य राजकीय स्वातंत्र्याच्या पूर्वी नाही तरी निदान पश्चात तरी व्यक्त करण्यास अनमान करूं नये. आणि गुप्तकाल हा सुप्तकाल जरी नसला तरी विजयानगरच्या उत्कर्षकालाचे अपेक्षेनेहि फिका पडतो. कोरीव लेख राजांविषयी थोडीशी माहिती पुरविणारे असले तरी कर्त्यांविषयी ते अगदी उदासीन असतात. म. म. मिराशींना हें मत निवळ अरुचिकरच नव्हे, तर शुद्ध पाखंडवाद वाटेल. तथापि त्यांनी व त्यांच्याशीं सहमत असणाऱ्यांनी मध्ययुगीन धर्माध्यक्षांप्रमाणे केवळ विशिष्ट मतप्रणालीचें समर्थन न करितां युक्तायुक्तविवेकपटु अशा बुद्धीने परिशीलन करून मग निष्कर्ष काढावे अशी विनंती करून हा लांबलेला लेख येथेच थांबवितों.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. शेंबवणेकर व गुप्तकाल (प्रा. शेंबवणेकरांस उत्तर)

वा. वि. मिराशी

प्रा. शेंबवणेकरांच्या लेखांत अनेक असत्य व विपर्यस्त विधानें असल्यामुळे त्यांना थोडक्यांत उत्तर देणें जरूर झालें आहे. हें उत्तर देतांना श्री. शेंबणेकरांच्या वादपद्धतीचा अवलंब करावयाचा नाही. सत्यान्वेषणाकरिता आवश्यक तेवढेंच शिष्टसंमत पद्धतीने लिहावयाचें आहे.

आम्ही श्री. शेंबवणेकरांच्या पुस्तकांतील विधानांचें परीक्षण केलें तें रियासतकार रा. ब. डॉ. गो. स. सरदेसाई यांच्या प्रसिद्ध झालेल्या पत्रांतील विनंतीवरून. त्यांत श्री. शेंबणेकरांवर वादांत जय मिळविण्याचा हेतु नव्हता. जय झाला असेल तर तो सत्याचा.

श्री. शेंबवणेकरांचीं विधानें खोडून काढलीं असतां ते तींच विधानें फिरून फिरून करतात यांत मुळीच अतिशयोक्ति नाही. एकच उदाहरण देतों. चार वर्षांपूर्वी पुण्याच्या 'प्रसाद' मासिकांत त्यांनी 'संस्कृत अलंकारशास्त्रकर्ते व सुभाषितसंग्रहकार यांच्या ग्रंथांत अश्वघोषाचे किंवा त्याच्या ग्रंथाचें नांवहि आढळत नाही किंवा त्यानी त्याच्या ग्रंथांतून कांहीसुद्धा उदाहरण दिलेलें नाही' असें ठासून म्हटलें होतें. त्याच मासिकांत त्यानंतर चार महिन्यांनी दिलेल्या उत्तरांत आम्ही कवींद्रवचनसमुच्चय, वामनाची काव्यालंकारसूत्रवृत्ति, वल्लभदेवाची सुभाषितावलि, राजशेखराची काव्यमीमांसा या अलंकारशास्त्रीय ग्रंथांत व सुभाषितसंग्रहांत अश्वघोषाचे कांही श्लोक नामनिर्देशासह दिलेले दाखविले होते. तरीहि श्री. शेंबवणेकरांनी तेंच विधान पुनः आपल्या Glamour about the Guptas या ग्र[ंथाच्या] पृ. ६५ वर केलें आहे. 'युगवाणी'च्या गेल्या दिवा[ळी] अंकांत आम्ही त्या पुराव्याचा पुनः निर्देश केल्यामुळे नाइलाज होऊन आता त्यांनी आपल्या पूर्वीच्या विधानाला थोडी मुरड घातली आहे. ते म्हणतात, 'अश्वघोष राजशेखरासारख्या एकाददुसऱ्या आलंकारिकाला माहीत असला तरी दण्डी, वामन, आनंदवर्धन, मम्मट, उद्भट वगैरे इतर प्रसिद्ध ग्रंथकारांना माहीत असल्याचें नजरेस येत नाही.' वामनाच्या काव्यालंकारसूत्रवृत्तींत (अधि. ४, अ. ३, सू. ५) आलेला अश्वघोषाचा श्लोक आम्ही त्यांना दाखविल्या[व]रही तो त्यांच्या नजरेस येत नाही, तेव्हा 'नैष स्थाणो[र]पराधः यदेनमन्धो न पश्यति' हेंच खरें.

श्री. शेंबवणेकर आपल्या लेखाचा गौरवपू[र्ण] उल्लेख अनेक विद्वानांनी केला आहे असें वरचेवर आपल्या लेखांत सांगत असतात. प्रस्तुत लेखांतही त्यांनी 'विक्रमस्मृती'तील विक्रमादित्यावरील आपल्या लेखाची प्रशंसा डॉ. कुर्तकोटी, डॉ. केदार वगैरेंनी त्या ग्रंथाच्या शेवटीं दिलेल्या अभिप्रायांत केल्याचा उल्लेख आहे. हें विधानहि बहुतांशी असत्य आहे. विक्रमस्मृति ग्रंथ आम्हापाशीं आहे. त्यांत डॉ. कुर्तकोटींचा मुळी अभिप्रायच आढळत नाही. अभिप्राय आहे तो डॉ. कुर्तकोटी कोल्हापुरांतून निघून गेल्यावर त्यांच्या गादीवर कोल्हापूरच्या कै. शाहूमहाराजांनी बसविलेल्या 'श्री क्षात्रजगद्गुरु पट्टग्रामपीठ' यांचा. पण त्यांतहि श्री. शेंबवणेकरांचा किंवा त्यांच्या लेखाचा नामोल्लेख नाही. डॉ. केदारांचा त्यांत अभि[]प्राय दिला आहे, पण त्यांतहि शेंबवणेकरांच्या लेखाचा निर्देश नाही. अशीं असत्य विधानें करून वाचकांच्या डोळ्यांत धूळ फेकल्याने काय साधणार ! वास्तवि[क] आहे.... इत्यादि विधानाची सत्यासत्यता कोणाच्या प्र[]... इत्यादि ...

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

— ठरवितां उपलब्ध प्रमाणांवरून ठरविली नाहीतर अनवस्था प्रसंग येईल. असो.

—श्रीमालवगणाम्नाते’ ‘मालवणगणस्थितिवशात्’ — कोरीव लेखांतील उल्लेखांत गण याचा अर्थ करणें शक्य नाही. नाहीतर मालवगणाच्या व गणाच्या नाण्यांवरील ‘मालवगणस्य जय’ …गणस्य जय’ या लेखांचा अर्थ ‘मालवांच्या व …ांच्या गणनेचा जयजयकार’ असा होईल व तो …ास्पद ठरेल हें उघड आहे.

चार सहा संस्कृत ग्रंथकारांनी आपल्या आश्रय-…याचा (अगदी क्वचित् कालाचा) निर्देश केला …ला तरी शेंकडो संस्कृत ग्रंथकारांच्या ग्रंथांत तो …ढळत नाही हें सर्वस्वी सत्य आहे. म्हणून गुप्तांच्या …ळीं अमुकच संस्कृत ग्रंथकार होऊन गेले असें …पणांस निश्चितपणे सांगता येत नाही असें आम्ही …टलें होतें आणि कांही ग्रंथकार गुप्तकालीं होऊन …ाचें इतर पुराव्यावरून दाखविलें होतें. श्री. …बवणेकरांना त्यांच्या विक्रमादित्याच्या काळीं—खिस्त-पूर्व पहिल्या शतकांत—कोणते संस्कृत ग्रंथकार निर्विवाद-पणें होऊन गेले असें विचारलें होतें. त्यावर त्यांना उत्तर देतां आलें नाही.

कालाच्या ओघांत वाङ्मय नष्ट होतें तें केवळ टिकण्याच्या लायकीचें नसतें म्हणून नव्हे. भासाचें स्वप्नवासवदत्त, पद्मगुप्ताचें नवसाहसांकचरित हीं कांही वर्षांपूर्वीपर्यंत केवळ नांवानें किंवा अलंकार ग्रंथांतील उदाहरणांवरूनच ज्ञात होतीं. तीं नष्टप्राय होण्यास लायक होतीं असें कोण म्हणूं शकेल ?

गुप्त राजे दुष्ट होते हें अलबेरुणीनें ऐकीव माहितीवर केलेलें विधान कसें असत्य आहे हें सम-कालीन पुराव्यावरून आम्ही सिद्ध केलें होतें. हे सर्व कोरीव लेख राजांचे, त्यांच्या मांडलिकांचे किंवा अधिकाऱ्यांचे नसून जैन उपासकांचे व मुनींचे आहेत व ते सार्वजनिक ठिकाणीं लेण्यांत व स्तंभावर कोरले आहेत. (फ्लीट–गुप्तलेख, पृ. ६७ व २५८ पहा) यांतील विधानें असत्य, आणि पांच–सहाशें वर्षांनी होऊन गेलेल्या अलबेरुणीनें ऐकीव विधान मात्र सत्य, यांतील ‘युक्तायुक्तविवेक’ अजब खरा !

“राज्यांप्रमाणे कीर्तीची उलटापालट झाल्याचें एखादें उदाहरण श्री. मिराशींनी द्यावें” असें श्री. शेंबवणेकर म्हणतात, म्हणून याचें एक सर्वमान्य उदाहरण–पुण्यश्लोक अशोकाचें–देतों. अशोकाच्या आता ज्ञात झालेल्या लेखांवरून तो कोणत्या योग्यतेचा व चारित्र्याचा पुरुष होता हें आपणांस माहीत झालें आहे. पण लंकेच्या दीपवंश व महावंश या बखरवजा पाली ग्रंथांत अशोकानें आपल्या सुमन नांवाच्या ज्येष्ठ भावाला व त्याखालच्या आणखी ९८ भावांना कंठस्नान घालून मगधाची गादी बळकावली असें म्हटलें आहे. अशोकाच्या विमल कीर्तीवरचा हा काळा कलंक शेंकडो वर्षें टिकला होता. गेल्या शतकांत अशोकाच्या कोरीव लेखांचा अभ्यास केल्यावर हा कलंक सर्वस्वी निर्मूल आहे अशी सर्वांची खात्री झाली आहे; कारण त्या लेखांत अनेक ठिकाणीं अशोक आपल्या कारकीर्दीत विद्यमान असलेल्या आपल्या भावाबहिणींचा उल्लेख करतो व त्यांच्या कल्याणाविषयी काळजी वाहतांना दिसतो. अशोकाचे लेख वाचले गेले नसते तर त्याच्या पूर्वचरितावरील कलंक वज्रलेप झाला असता. हें एकच उदाहरण श्री. शेंबवणेकरांचें विधान खोडण्यास पुरेसें आहे. जगांत नेहमीच कीर्तीची अपकीर्ति होते असें नाही. पण क्वचित् तसेंहि झालेलें आढळतें यांत संशय नाही. गुप्तानंतरच्या काळांत त्यांचीं नांवेंहि लोकांच्या स्मरणांतून गेलीं पण त्यांची—एकादोघांची नव्हे तर सर्व गुप्तराजांची—दुष्टता मात्र टिकून राहिली असावी हें असंभवनीय आहे. यासारखें ऐकीव माहितीवर आधारलेलें अलबेरुणीचें आणखीहि एक विधान कसें चूक आहे हें आम्ही आप-ल्या मागील लेखांत दाखविलें आहे.

श्री. शेंबवणेकरांचा ज्यावर मुख्य भर आहे तो कथासरित्सागरांतील विषमशील लंबक मूळच्या बृहत्कथेंत होता किंवा तो मधल्या हजार वर्षांच्या काळांत तींत घुसडण्यांत आला हें निश्चित करणें जरूर आहे असें आम्ही आपल्या लेखांत म्हटलें होतें. त्यावर श्री.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शेंबवणेकर म्हणतात की तो भाग प्रक्षिप्त मानण्यास कांहीहि विरुद्ध पुरावा नाही. त्या कथेचा जरा बारकाईने विचार केल्यास तसा पुष्कळ पुरावा सापडूं शकेल. त्या कथेंतील विक्रमादित्याने अपरान्त (कोकण)-सहित सर्व दक्षिण देश, मध्यदेश, सौराष्ट्र, वंग, अंग, काश्मीरादि उत्तरेचे देश व इतर अनेक द्वीप जिंकले होते असें कथासरित्सागरांत वर्णन आहे. हें वर्णन खिस्तपूर्व पहिल्या शतकांतील कोरीव लेखादि पहिल्या प्रतीच्या ऐतिहासिक साधनांवरून जो भारताचा इतिहास आता ज्ञात झाला त्याशीं विसंगत आहे हें डॉ. अळतेकरांनी 'सह्याद्रि' मधील लेखांत यापूर्वीच दाखवुन दिलें असतां श्री. शेंबवणेकर त्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करीत आहेत. त्या कथेंत कालविपर्यय (anachronism) यासारखा विसंवादी संदर्भ स्पष्ट दाखविल्यास ती प्रक्षिप्त मानण्याची त्यांची तयारी दिसते म्हणून तसा दोष दाखवितों. हा विषमशील ऊर्फ विक्रमादित्य ई.स. पूर्वी ५८व्या वर्षी स्थापिलेल्या विक्रमसंवताचा उत्पादक असें शेंबवणेकरांचें म्हणणें आहे. अर्थात् तो खिस्तपूर्व पहिल्या शतकांत झालेला. मग त्याची कथा खिस्तपूर्व पांचव्या शतकांत होऊन गेलेल्या नरवाहनदत्ताला काश्यप किंवा कण्वमुनीने एका अरण्यांत सांगितली असें जें कथासरितत्सागर (१८, १, ३–८) व वृहत्कथामंजरी (१०, १, २–१२) या बृहत्कथेच्या दोन्ही रूपान्तरांत वर्णिलें आहे त्याची संगति कशी लावावयाची ? नरवाहनदत्त हा वत्सराज उदयनाला वासवदत्तेच्या पोटीं झालेला मुलगा. उदयन हा गौतमबुद्धाचा समकालीन होता. तेव्हा तो खिस्तपूर्व सहाव्या शतकाच्या अखेरीस व त्याचा मुलगा नरवाहनदत्त खिस्तपूर्व पांचव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला असावा यांत संशय नाही. तेव्हा नरवाहनदत्ताला ज्याची कथा सांगितली होती तो विषमशील-विक्रमादित्य विक्रमसंवताचा संस्थापक होऊंच शकत नाही व तो त्या संवताचा संस्थापक होता असें मानलें तर कालविपर्यासाचा दोष टळत नाही असा हा 'उभयतः-पाशा रज्जुः' या तऱ्हेचा दुहेरी पेच आहे. यांतून शेंबवणेकरांना आपली सुटका करून घेणें अतिशय कठीण जाईल.

बरें, हा विषमशील-विक्रमादित्य विक्रमसंवताचा संस्थापक मानला तरी तो परमारवंशी कशावरून ? कथासरित्सागरादि ग्रंथांत तसा निर्देश नाही. पुराणांत तर त्याचें नांवहि येत नाही. तो परमारवंशी होता असें मानण्यास शेंबवणेकरांस आधार मिळाला तो त्यानंतर हजार पंधराशें वर्षांनी रचलेल्या राजपुतांच्या वंशावळींत व अबुल फाजलच्या 'ऐनी अकबरीं'त ! या वंशावळी ऐतिहासिक कालाकरिता कशा अविश्वसनीय आहत हें म. म. गौरीशंकर ओझांनी आपल्या राजपुतान्याच्या इतिहासांत अनेक ठिकाणीं दाखवून दिलें आहे. ऐनी अकबरींतील मुंज भोजांच्या कथा भोज प्रबंधांतल्याप्रमाणे सर्वस्वी काल्पनिक व कोरीव लेखांच्या पुराव्याच्या विरुद्ध म्हणून त्याज्य आहेत. अशा रीतीन वडाची साल पिंपळाला लावून शेंबवणेकरांनी ही कल्पितकथ रचली आहे व ती लोकांनी एतिहासिक मानाद याकरिता ते आपल्या जिवाचा आटापिटा करीत आहेत. पण तज्ज्ञ लोक तें कसें मान्य करतील ?

गुप्तकालाला सुवर्णयुग मानणाऱ्या आपल्या प्रतिपक्षीयांना शेंबवणेकर युरोपीय विद्वानांचे अनुयायी समजतात व राजकीय स्वातंत्र्यानंतर तरी त्यांनी बुद्धि-स्वातंत्र्य व्यक्त करण्यांत अनमान करूं नये असा उपदेश करतात. स्वतंत्र भारतांतील विद्वान् उपलब्ध झालेल्या सर्व साधनांचा उपयोग न करतां केवळ कूपमंडूकवृत्तीने जुन्या कल्पनाच उराशीं बाळगून त्यांत समाधान मानतील तर तें बुद्धिस्वातंत्र्य नसून ती शुद्ध आत्मवंचना होईल. त्याने देशाची प्रगति न होतां परागतिच होईल यांत संशय नाही. शास्त्रीय ज्ञानाप्रमाणेच ऐतिहासिक संशोधनांतहि हें स्वकीयांचें म्हणून ग्राह्य व परकीयांचें म्हणून त्याज्य असें मानल्यास देशाचा खरा इतिहास ज्ञात होणार नाही. तेव्हा जयापजयाची क्षिति न बाळगतां केवळ सत्यान्वेषण दृष्टीने व निराग्रही वृत्तीने सर्व उपलब्ध प्रमाणांचा विचार करावा असें शेंबवणेकरांना पुनः एकदा सुचवून या विषयाची रजा घेतों.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

पुनश्च हरिः ॐ

मा. गो. देशमुख

'हरिभाऊं'च्या नांवामागे "कै०" हें उपपद लावण्याची इतक्या लौकर वेळ येईल असें वाटलें नव्हतें! बरोबर पांच वर्षांपूर्वी विदर्भ साहित्य संघाचे उत्साही सरचिटणीस कै. नारायण कृष्ण दिवाणजी यांचा अपघाती मृत्यु होऊन विदर्भ साहित्य संघाला जो धक्का बसला त्याचे वेपथु कसेबसे थांबतात न थांबतात तोंच पांच वर्षांनंतर हा दुसरा तसाच प्रसंग.

कै. प्रा. दिवाणजींच्या मृत्यूप्रमाणे हरिभाऊंचा मृत्यु हा कांही अगदी अकाल वा अपघाती नव्हता, परंतु खुद्द दिवाणजींनीच १९५० सालासाठी हरिभाऊंच्या नांवाची अध्यक्षपदासाठी सूचना करावी व न्हा नाही तरी निदान पांच वर्षांनंतर त्यांची अध्यक्षपदीं विधियुक्त स्थापना व्हावी यासाठीच जणूं कांही ते राहिले व आता आपले दिवंगत परम स्नेही दिवाणजी यांची अंतिम इच्छा पूर्ण झाली असें पाहतांच, आपल्या उर्वरित कारकिर्दीची निरवानिरव न करतां आमच्या सरचिटणिसांप्रमाणे यंदाचे अध्यक्षहि त्यांच्याच पावलावर पाऊल ठेऊन लोकैषणेची तमा न बाळगतां, पाहतां पाहतां नाहीसे व्हावे, ह्या दैवदुर्विलासाला पांच वर्षांपूर्वीच्या त्या दुर्घटनेशिवाय दुसरी उपमा नाही!

कै. दिवाणजींनी ज्या निरलस कर्तृत्वाने विदर्भ साहित्य संघ नांवारूपाला आणला तें कर्तृत्व कै. हरिभाऊंच्याच रूपाने आजवर जिवंत होतें. हरिभाऊ हे वि. सा. संघरूपी एकत्र कुटुंबाचे कर्ते पुरुष होते. कर्ता गेल्यानंतर कुटुंबीयांना जसें पोरकें झाल्यासारखें वाटतें तशीच स्थिति या संस्थेच्या कार्यकर्त्यांची आज झाली आहे, यांत कांही अत्युक्ति नाही. किंबहुना हरिभाऊंच्या कुटुंबीयांवर त्यांच्या मृत्यूचा जो घाला पडला व त्यांना जसा त्याचा चटका बसला तसा [illegible] या संस्थेलाहि जाणवला. म्हणून त्यांचे [illegible] असंख्य स्नेही व चाहते यांप्रमाणे वि. सा. संघालाहि त्यांचा मृत्यु अकाल व आकस्मिकच ठरला हें निश्चित.

कै. हरिभाऊंच्या मृत्यूनंतर अनेक सभा, संस्था व व्यक्ति यांनी जी त्यांच्या दिवंगत आत्म्याला स्मृति-श्रद्धांजली वाहिली त्यांत त्यांचे कांही जिवलग स्नेही होते, तसेंच कांही उदासीन भासणारे परकेहि होते.

कै. हरिभाऊंनी जन्मभर आपल्या सभोवतालीं खेळाडू वृत्तीचें नंदनवन फुलविलें व या त्यांच्या जन्मजात इन्द्रपदाच्या अभिलाषेसाठी व त्यांच्या निर्लेप आनंदी स्वभावाशीं स्पर्धा करण्यासाठी अनेक वाग्वीर झगडले. परंतु विचारे इतरे जन. त्यांना हरिभाऊंच्या अजातशत्रुत्वाचाच हेवा वाटत होता. ते हरिभाऊंच्या नांवें आपापसांतच सुंदोपसुंदी करकरून थकले व सर्वांनी हरिभाऊंना अंतिम श्रद्धाञ्जलीच्या रूपाने आपल्या पराभवाची पावती दिली. अशा रीतीने हेवाविषय झालेली हरिभाऊंची खेळकर विनोदीवृत्ति ही एक मनुष्यस्वभावाची मोठी मूल्यवान् देणगी आहे. मानसशास्त्राचा असा एक नियम आहे की, बाह्यतः खेळकरपणाने व विनोदी वृत्तीने वागणाऱ्या माणसाचें अंतर्मन अत्यंत गंभीर अशा जीवनसमस्यांनी भारावलेलें असतें. हरिभाऊंच्या या विलोभनीय वैशिष्ट्याचा विचार करतांना विख्यात इंग्रजी नट गॅरिक याच्या एका गोष्टीची आठवण होते

नटश्रेष्ठ गॅरिकचे सहस्रावधि जनतेला आपल्या विनोदप्रचुर अभिनयाने हसविणारे नाट्यप्रयोग चालू असतांना एक मनोविषण्ण रोगी एका मनोवैज्ञानिकाकडे गेला व आपल्या मनावरील औदासिन्याचें पटल कसें दूर करतां येईल याबद्दल उपाययोजना सुचविण्याची त्याने याचना केली. अनेक परिप्रश्नांनी त्याचा मनोविकार जाणून घेऊन त्या मनोविज्ञानवेत्त्याने त्याला हातासरशीं असलेला रामबाण उपाय सुचविला. "आपल्याच शहरांत नवटर्य गॅरिकचे हसतां हसतां पोट नाट्यप्रयोग सुरू आहेत. ते पाहून तुझी हा हा म्हणतां नाहीशी होईल." हा उपाय

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ऐकतांच तो रोगी अधिकच खिन्न झाला व एक निराशेचा सुस्कारा टाकून उद्‌गारला, "तोच मी दुर्दैवी गॅरिक आपणांसमोर उभा आहें."

कै. हरिभाऊ हे आमच्यांतील असेच सुदैवी आणि दुर्दैवी गॅरिक होऊन गेले. ते बाह्यतः कितीहि मनमोकळे, खेळकर, विनोदी आणि बोलके म्हणजे बहिर्मुख वृत्तीचे दिसत असले तरी त्यांच्या सहवासाची संधी मिळालेले त्यांचे स्नेही योग्य प्रकारें जाणतात की वस्तुतः ते संकोची, विविक्त आणि अंतर्मुख वृत्तीचेच होते. त्यांच्या या लोभनीय व्यक्तित्वाला अथांग सागराचीच उपमा शोभून दिसेल. 'आवर्तबुद्‌बुदतरंगमयात् विकारात्' अशा कोटिबाजपणाच्या आवरणाखाली 'सर्वेषामविरोधेन' वागणाऱ्या एका स्थितप्रज्ञ जिज्ञासूचें व्यक्तिमत्व दडलेलें होतें हा विरोधाभास ज्याने जाणून घेतला त्यानेच खऱ्या हरिभाऊंना ओळखलें. आत्मस्तुति आणि परनिंदा या मनुष्यस्वभावांतल्या सार्वजनिक दोषांपासून ते किती अलिप्त होते याची आठवण त्यांच्या परिचितांना उत्तरायुष्यांत खात्रीने प्रेरक ठरेल.

असो. हरिभाऊ तर मोठे वैभवशाली व कर्तृत्वशाली वीरमरण घेऊन गेले. आपण सर्वांनी त्यांच्या संस्मरणांतून 'पुनश्च हरि ॐ' म्हणून त्यांच्याच श्रद्धांजलींतून त्यांनी सुरू केलेलें कार्य पुढे चालविण्याचा संकल्प केला पाहिजे.

कै० हरिभाऊ नेने (आदरांजलि)

सुरेश डोळके

काळपुरुषाची तुलना मी एखाद्या लहरी सम्राटाशीं करीन. तसें नसतें, तर 'भावबंधन' नाटकाचा शेवटचा प्रवेश लिहिल्यानंतर अवघ्या तीन तासांच्या आंत गडकऱ्यांच्या पात्राला कालाच्या नाट्यकथानकांतून काळपुरुषाने दूर कशाला केलें असतें!—साहित्याची उपासना करतांनाच 'साहित्यसम्राट' केळकरांना कालग्रंथांतून कायमचें हद्दपार केलें नसतें आणि हरिभाऊंच्या यशाचा पेला तोंडाशीं आला असतांना तो न पितांच हरिभाऊंचे जीवन संपलें, अभिनंदनाचीं पत्रें वाचीत असतांनाच हरिभाऊंची दृष्टि कायमची मिटली, हरिभाऊंचें संकल्प आणि त्यांच्या चाहत्यांच्या त्यांच्या विषयीच्या अपेक्षा पुऱ्यापुऱ्या उच्चारल्या गेल्या नसतांनासुद्धा जीवनाच्या सारीपाटावरून [illegible] दूर व्हावें लागलें, असें वर्णन कालाच्या [illegible] या कलावन्ताने केलें नसतें.

ता. २० नोव्हेंबर (१९५४) रोजीं सकाळीं १० वाजतां मी त्यांना भेटायला गेलों. त्यांच्या खोलींत प्रवेश करतांच मी त्यांना नमस्कार करून म्हटलें, 'तुमचं अभिनंदन करण्यासाठी आलों आहें मी हरिभाऊ' त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीचें स्मित झळकलें. त्यांनी उलट नमस्कार करून माझ्या अभिनंदनाचा स्वीकार केला. बिछान्यावर झोपून त्रास होत असल्यामुळे ते आरामखुर्चीवर पडून होते. त्यांच्या चेहऱ्यावरल्या सात्विक स्मितांत असहायतेची, कारुण्याची सूक्ष्म लकेर मिसळून गेली होती. मी बोलूं लागलों. माझें बोलणें ते लक्षपूर्वक ऐकत होते. त्यांनी 'सुविचार व्याख्यानमाले'ची चौकशी केली, ह्ळवी भाषेच्या संशोधनाची विचारपूस केली आणि 'गद्यराज' हा जो महानुभावीय काव्यग्रंथ त्यांच्या मार्गदर्शनाखाली मीं संपादन करायचें ठरलें होतें, त्यांतल्या मुक्तछंदाची चर्चाहि पण त्यांनी केली.

दोन तासांनी मीं उठलों. हरिभाऊंनी नमस्कारपूर्वक मला निरोप दिला. त्यांचे दर्शन आपल्याला पुन्हा होणार नाही अशी शंकाहि मला तेव्हा आली नाही. त्यापूर्वी एक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महिन्यापासून हरिभाऊंच्या जीवनाशीं खेळ खेळणाऱ्या कालपुरुषाने अखेर ता. २२ नोव्हेंबर रोजीं पहाटे ४ वाजतां जीवनाच्या क्षेत्रांतून हरिभाऊंना कायमचें हद्दपार केलें ! आयुष्याचीं दोन तपें विविध विषयांच्या व्यासंगांत आणि चिंतनांत घालविलेल्या साधुशील पा[illegible] आम्ही कायमचे अंतरलों. हरिभाऊंचा माझा [illegible]चय तसा जुना नव्हता. त्यांनी लिहिलेल्या संस्कृत [illegible]ठ्यपुस्तकांचा अभ्यास मी विद्यालयांतून केला होता. [illegible] पुस्तकांचा अभ्यास करतांना माझ्या डोळ्यांसमोर लेखकाची जी मूर्ति उभी राही, ती मनमोकळ्या, [illegible]नसंपन्न व प्रेमळ अशा गुरुजींची होती. या पुस्तकां[illegible] लेखकाला प्रत्यक्ष पाहावें अशीहि इच्छा तेव्हाच [illegible]र्माण झाली. पुढे मी मॅट्रिक होऊन नागपूरला [illegible]विद्यालयीन शिक्षणाकरिता आलों. प्रि. मिराशी, [illेवेदी], प्रा. सोमलवार इत्यादि विद्वानांच्या व [illegible]ात प्राध्यापकांच्या संस्कृत अध्यापनाचा लाभ [illegible] घडला. त्यामुळे संस्कृतची गोडी वाढीला लागली. [illegible]भाऊंना पाहण्याची इच्छा मनांतल्या मनांत तशीच [illegible] होती. एम्. ए. ला असतांना हरिभाऊंनी संपादिलेल्या कांही महानुभाव ग्रंथांचा व त्यांनी लिहिलेल्या भाषाशास्त्रीय आणि व्याकरणविषयक लेखांचा मी अभ्यास केला होता. त्यांच्याविषयीचा माझा आदर खूप वाढला होता. पण १९५१ सालीं, एम्. ए. ची परीक्षा पास होतपर्यंत माझी ही इच्छा तृप्त झाली नाही. डॉ. कोलते यांनी संपादिलेल्या 'स्थानपोथी'चें मी लिहिलेलं परीक्षण २९ जुलै १९५१ च्या 'तरुण भारतां'त प्रसिद्ध झालें. आणि दुसऱ्याच दिवशीं हरिभाऊंचें पत्र मला आलें. ज्यांच्या विद्वत्तेबद्दल मला आदर वाटत होता, ज्यांना पाहण्याविषयी दीर्घकालापासून माझ्या मनांत उत्सुकता होती, त्यांनी स्वतः होऊन भेटीला बोलवावें याचा मला अभिमान वाटला. मी हरिभाऊंच्या घरीं गेलों, त्यांना नमस्कार केला. त्यांनी माझें स्वागत केलें. चेहऱ्यावर तेंच प्रेमळ स्मित, वृत्तींत तीच बालकाची निरागसता, सहवासांत तीच अभिजात सात्त्विकता. त्यांच्या प्रसन्न सात्त्विकतेनेच मी मुग्ध होऊन गेलों.

त्यानंतर गेल्या तीन वर्षांत हरिभाऊंनी मला प्रत्येक बाबतींत मार्गदर्शन केलें आहे. ज्ञानी गुरूच्या अहंकाराने नव्हे, जिवलग सुहृदाच्या प्रेमळ भावनेने !

हरिभाऊंना संशोधनाच्या क्षेत्रांत मागे टाकणारे अनेक संशोधक मराठींत आहेत. प्राचीन मराठीचे व्यासंगी अभ्यासक म्हणून महाराष्ट्रांतल्या अनेक लेखकांनी हरिभाऊंपेक्षा जास्त कीर्तीहि मिळविली आहे. पण, 'हरिभाऊ' या प्रेमळ घरगुती नांवाने ओळखल्या जाण्याचें भाग्य मात्र यांपैकीं एकाच्याहि वाट्याला आलें नाही. हें यश हरिभाऊंच्या साधुत्वाचें आहे, त्यांच्या अभिजात सात्त्विकतेचें आहे.

हरिभाऊंच्या जीवनाला अनेक पैलू होते—शैक्षणिक, साहित्यिक आणि सामाजिक. सहकारी संस्था, कहाते गोखले व्यायामशाळा, सुविचार व्याख्यानमाला राजाराम वाचनालय, भिडे कन्या शाळा, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, विदर्भ साहित्य संघ इ. अनेक संस्थांशीं त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध होता हरिभाऊंच्या मृत्यूने या संस्था पोरक्या झाल्या आहेत. ही हानि केवळ एका कार्यकर्त्याची किंवा सल्लागाराची नाही. कार्यकर्ते किंवा सल्लागार काय, हवे तितके मिळतात. पण त्या संस्थेला स्वतःच्या जीवनाचा एक अविच्छिन्न भाग समजून संस्थेच्या हिताची अष्टौप्रहर काळजी वाहणाऱ्या, स्वतःच्या व्यक्तित्वाचें खतपाणी घालून आईच्या मायेने आणि पित्याच्या आपुलकीने संस्थेचें संवर्धन करणाऱ्या सत्प्रवृत्त आत्म्याची हानि आहे ती.

हरिभाऊ निःसीम ज्ञानोपासक होते. ज्ञानदेवतेच्या उपासनेशीं त्यांची एकरूपता झाली होती. संस्कृत, मराठी व इंग्रजी या तीन भाषांतल्या प्रावीण्यामुळे त्यांतील अनेक ग्रंथांच्या अध्ययनाची व व्यासंगाची जोड त्यांच्या ज्ञानोपासनेला मिळाली होती. हरिभाऊंकडे कधीहि जा, कुठल्या तरी ग्रंथाच्या वाचनांत, कसल्या तरी लेखाच्या चिंतनांत ते सदा मग्न असायचे. त्यांच्या वृत्तींत जो एक प्रकारचा निरागस बालभाव दृष्टीस पडे, त्या बालभावाला अनुरूप अशीच [illegible] ची जिज्ञासाहि अविषय आणि चिरंजीव

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होती. या जिज्ञासेमुळेच शिक्षणमानसशास्त्रापासून तों महानुभावीय संशोधनापर्यंत् आणि ज्ञानेश्वरी–दासबोधाच्या व्याकरणापासून तों काव्यनाटकांच्या रसग्रहणापर्यंत वाङ्मयाच्या विविध क्षेत्रांत त्यांच्या प्रतिभेला संचार करतां आला.

'विद्या विनयेन शोभते' या सुभाषिताचा प्रत्यय व्यवहारांत कधीच येऊं नये असा विद्येला शापच आहे की काय असें मला वाटे. परंतु हरिभाऊंना पाहिल्यानंतर विद्वान् थोडेबहुत तरी आहेत याची साक्ष पटली. असाच अनुभव मला विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी यांच्या सहवासांत आला.

संस्कृत साहित्यशास्त्रांतल्या 'प्रसाद' गुणाचा हरिभाऊंनी अभ्यास केला असेल. त्यांच्या लिखाणांत ठिकठिकाणीं तो उतरला आहे. पण भगवंतांनी

> 'रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिंद्रियैश्चरन्
> आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥

हा गीतेंत (२, ६४) सांगितलेला 'प्रसाद' गुण हरिभाऊंनी आपल्या जीवनांत उतरविला होता. या प्रसन्नतेनेच त्यांच्या बुद्धीला स्थिरता आली होती. या आंतरिक प्रसादगुणामुळेच लौकिक दृष्टीने अनेकदा अपयश येऊनहि जीवनांत जगण्यासारखें पुष्कळ आहे असें हरिभाऊंचें जीवनविषयक तत्त्वज्ञान होतें. या प्रसन्नतेमुळेच त्यांच्या चेहऱ्यावरलें लोभनीय स्मित शेवटपर्यंत मावळलें नाही.

आणि म्हणूनच हरिभाऊंच्या मृत्यूने प्रसन्नतेचा दीपस्तंभ मालवला या भावनेने मन सुन्न होऊन जातें! सात्त्विकता हाच हरिभाऊंचा आत्मीय विशेष होता. त्यांच्या सहवासांत काय किंवा वाङ्मयांत काय या सात्त्विकतेचाच प्रत्यय पहिल्यान्दा येत असे. या सात्त्विकतेमुळेच हरिभाऊंच्या वाणींतून किंवा लेखणींतून कोणाविषयी सहसा कटु शब्द निघाला नाही. हरिभाऊ अजातशत्रु होण्याचेंहि कारण हेंच असावें. गेल्या दोन तपांत महानुभावीय संशोधनाच्या किंवा प्राचीन मराठी व्याकरणाच्या व भाषाशास्त्राच्या व्यासंगाच्या निमित्ताने अनेकांशीं मतभेद व्यक्त करण्याचे प्रसंग हरिभाऊंवर आले असतील. पण तेहि त्यांनी इतक्या सौजन्याने व्यक्त केले असतील की त्यांच्याबद्दल विखार किंवा कटुतेची भावना एकाच्याहि मनांत निर्माण झाली नसेल.

हरिभाऊंच्या विकसित व्यक्तित्वाचा आत्मा सर्वस्पर्शी सात्त्विकता हाच होता. सात्त्विकतेंत अ[illegible] निवेश नसतो, प्रसन्नता असते. हरिभाऊ सत्[illegible] उपासक होते. पण सत्यशोधनाकरिता मूर्तिभंजना[illegible] मार्ग त्यांनी कधीच स्वीकारला नाही. लौकिक दृष्टीने हरिभाऊंना आयुष्यांत अनेकदा अपय[illegible] आलें. कौटुंबिक आपत्ति तर लहानपणापासून त्यांच्या हात धुवून पाठीला लागल्या होत्या. नशिब हरिभाऊंना क्वचितच साथ दिली असेल. तरीदेखील त्यांच्या चेहऱ्यावरलें मंदमधुर स्मित कधीहि माव[illegible] नाही. जीवनांतल्या अपयशांनी किंवा मनुष्यस्वभावा[illegible] कटु अनुभवांनी त्यांची जीवनाच्या मांगल्या[illegible] श्रद्धा कधीहि विचलित झाली नाही. याला [illegible] त्यांची अभिजात सात्त्विकताच. पण व्यवहारांत यशस्[illegible] व्हायला मनुष्य सात्त्विक असून चालत नाही. 'आत्मन्येवात्मना तुष्टः' या न्यायाने हरिभाऊंचें जीवन सुखी असेल. पण, लौकिक दृष्टीने त्यांची अभिजात सात्त्विकता हा त्यांना मिळालेला शाप होता. हरिभाऊ इतके सात्त्विक नसते तर जीवनांत, लौकिक दृष्टीने ते अधिक यशस्वी झाले असते, असा विचार मनांत आल्यावाचून राहत नाही.

हरिभाऊंची तुलना कै. वामन मल्हार जोशी यांच्याशींच करावी लागेल. दोघेहि उत्कृष्ट शिक्षक, सात्त्विकता हा दोघांचाहि आत्मीय विशेष, आंतरिक सौजन्य हा दोघांच्याहि विकसित व्यक्तित्वाचा आत्मा, दोघेहि निष्ठावान् ज्ञानोपासक, जीवनांत अनेकदा अपयश येऊनहि जीवनाच्या मांगल्यावरली दोघांचीहि श्रद्धा शेवटपर्यंत अविचलित आणि वाङ्मयापेक्षा दोघांच्याहि व्यक्तित्वाचें सामर्थ्य फार मोठें.

हरिभाऊंचें हें व्यक्तित्व त्यांच्या वाङ्मयांतहि उतरलें आहे. हरिभाऊ हे उत्कृष्ट शिक्षक, शिक्षण-[illegible]मानस-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शास्त्रज्ञ, प्राचीन मराठीचे व्याकरणतज्ज्ञ इत्यादि विविध नात्यांनी मराठी वाचकांना फार पूर्वीपासून परिचित असले तरी महानुभाव संशोधक व प्राचीन मराठीचे व्याकरणतज्ज्ञ म्हणून त्यांची ख्याति विशेष आहे. महानुभावीय गद्यग्रंथांच्या शास्त्रीय संपादनाचा पायंडा कै. भवाळकर यांच्या प्रोत्साहनाने व सहकार्याने हरिभाऊंनीच पाडला असें म्हणायला प्रत्यवाय नाही. 'श्रीचक्रधर सिद्धान्तसूत्रें भा. १' व 'दृष्टान्तपाठ' हे भवाळकरांच्या सहकार्याने तयार केलेले दोन ग्रंथ सोडल्यास 'लीळाचरित्रां'चे ६ भाग, 'सूत्रपाठ', 'नित्यदिनी लीळा', 'आचारस्थळ', 'महावाक्यप्रमेय', 'लक्षणरत्नारत्नाकर' इत्यादि विनीचे महानुभावीय गद्यग्रंथ प्रकाशांत आणून हरिभाऊंनी प्राचीन मराठीची फार मोठी सेवा केली आहे. हरिभाऊंच्या विविध प्रकारच्या वाङ्मयसेवेतून त्यांनी केलेल्या महानुभाव वाङ्मयाच्या व प्राचीन मराठी भाषाशास्त्राच्या सेवेकरिता मराठी अभ्यासक त्यांचे सदैव ऋणी राहतील.

विदर्भ साहित्य संघ

सर्वसाधारण सभेची सूचना

रविवार दि. २०-२-१९५५ रोजीं सकाळीं ८-३० वाजतां संमेलनप्रसंगीं भरणारी सर्वसाधारण सभा केन्द्रीय कार्यालयांत भरेल.

: सभेपुढील विषय :

(१) घटना नियम १२ (अं) प्रमाणे लवादाची निवडणूक.
(२) परीक्षा समितीच्या रु. ५०० च्या जादा खर्चास मंजुरी.
(३) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

विशेष सूचना:—गणपूर्तीच्या अभावीं ही सर्वसाधारण सभा स्थगित झाल्यास तीच सभा त्याच दिवशीं त्याच जागीं ९ वाजतां सकाळीं भरेल.

दि. ३१-१-१९५५
केन्द्रीय कार्यालय,
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सं घ वा र्ता

केन्द्रवृत्त, नागपूर

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. २-१-५५ रोजीं सकाळीं ९ वा. केन्द्रीय कार्यालयांत उपाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांचे अध्यक्षतेखाली भरून खालीलप्रमाणे कामकाज झालें :

१. प्रथम चिटणिसाने दि. ५-१२-१९५४ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

२. त्यानंतर, अचलपूर (परतवाडा) येथील सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष श्री. पांगारकर व चिटणीस श्री. श्री. शां. गुप्ते यांची आर्थिक अडचणीमुळे अचलपूर येथे वि. सा. संघाचें संमेलन भरवितां येत नसल्याचीं पत्रें सभेला सादर करण्यांत आलीं. त्यावर विचार होऊन, वि. सा. संघाचें संमेलन जानेवारी ५५ च्या दि. २७ ते २९ च्या दरम्यान नागपूरलाच भरविण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला. तसेंच या अधिवेशनाची सर्व कार्यवाही उपाध्यक्षांनी कार्यकारी मंडळांतील स्थानिक सभासदांच्या सल्ल्याने करावी, असाहि निर्णय घेण्यांत आल्यावर ही सभा संपली.

* *

विशेष साधारण सभा

दि. ३१-१२-५४ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेने दिलेल्या आदेशानुसार घटनेंत बदल करण्याच्या सूचनांसंबंधी विचार करण्यासाठी रविवार दि. १६ जानेवारी, १९५५ रोजीं सायं. ४ वा. विशेष साधारण सभा, उपाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली, केन्द्रीय कार्यालयांत भरली.

सभेच्या सुरवातीला सभाध्यक्षांनी संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांच्या आकस्मिक निधनानिमित्त खालील दुखवटयाचा ठराव मांडला.

"विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष, महानुभाव वाङ्मयाचे थोर संशोधक, आणि एक संस्कृत पंडित श्री. हरि नारायण नेने, यांच्या आकस्मिक निधनामुळे विदर्भ साहित्य संघाच्या या विशेष साधारण सभेला अतीव दुःख होत आहे.

मध्यप्रदेशांतील अनेक सार्वजनिक संस्थांचे प्रणेते आणि प्रवर्तक व म. प्र. शासन साहित्य परिषदेचे नियुक्त सभासद म्हणून कै. हरिभाऊंनी ज्या निरपेक्ष आणि निरलस वृत्तीने समाजाची सेवा केली त्यामुळे त्यांना मध्यप्रदेशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनांत चिरस्मरणीय अग्रस्थान प्राप्त झालें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्राच्या या साधुशील ज्येष्ठ साहित्यिकाचा वि. सा. संघाशीं आलेला संबंध म्हणजे त्यांच्या जीवनांतील महान तपस्या आहे. त्यांच्या निगर्वी, विनोदी आणि मनमिळाव्र स्वभावाने त्यांनी वि. सा. संघाला आजच्या भरभराटीच्या स्वरूपास आणून सोडलें आहे. कै. हरिभाऊंच्या कुटुंबियांवर ओढवलेल्या आपत्तींत ही सभा सहभागी आहे.

ईश्वर मृताचे आत्म्यास सद्‌गति देवो, ही प्रार्थना !"

एक मिनिट स्तब्ध उभें राहून सभेने दिवंगत संघाध्यक्षांना श्रद्धांजलि अर्पण केली.

नंतर सभाध्यक्षांनी घटनासमितीचे अध्यक्ष रा. सा. खं. के. रांगोळे, यांना सभेपुढे ठराव मांडण्याची विनंती केली.

श्री. रांगोळे यांनी खालील ठराव १ कलमवार सभेपुढे वाचून ठरावाच्या स्पष्टीकरणार्थ निवेदन केलें.

ठराव १—नियम १२ नंतर खालील नियम नवीन घालण्यांत यावेत:—

१२-अ (क) नियम १२ मध्ये उल्लेखिलेल्या अध्यक्ष व कार्यकारी-मंडळ यांच्या निवडणुकी ह्या वेगवेगळया निवडणुकी समजण्यांत येतील.

(ख) कोणाहि उमेदवारास आपली उमेदवारी परत घ्यावयाची असल्यास नियम १२ (उ) प्रमाणे नामनिर्देश पत्रिकांची छाननी होऊन यादी निश्चित करण्यांत आल्यानंतर दोन दिवसांचे आंत त्याने पुढील नमुन्याप्रमाणे पत्र अध्यक्षांचे नांवें केन्द्रीय संघकार्यालयाकडे कार्यालयाच्या कामाच्या वेळांत पाठविलें पाहिजे.

"मी अध्यक्षपदाकरिता/कार्यकारी मंडळाच्या सभासदत्वाकरिता उमेदवार म्हणून दिलेलें नांव परत घेतों.

ता. सही ....

(ग) वरील पोटनियम (ख) प्रमाणे पत्र पाठवून उमेदवारी परत घेण्यांत आल्यावर ही मागणी परत घेण्याचा अधिकार उमेदवारास राहणार नाही.

(घ) उमेदवारी परत घेण्यासाठी असलेली दोन दिवसांची मुदत संपल्यावर निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची अधिकृत यादी तयार करण्यांत आली पाहिजे.

(ङ) अधिकृत यादीप्रमाणे अध्यक्षपदासाठी केवळ एकच उमेदवार उभा असल्यास तो निवडून आल्याचें तात्काळ जाहीर करण्यांत आलें पाहिजे. तसेंच कार्यकारी सभासदांच्या भरावयाच्या जागांइतकीच किंवा त्याहून कमी उमेदवारांची संख्या असल्यास ते सर्व उमेदवार निवडून आल्याचें तात्काळ जाहीर करण्यांत आलें पाहिजे.

(च) मतदारांच्या यादींत नोंदलेल्या मतदारांच्या पत्त्यावर निवडणूक मतपत्रिका नियम १२ (क) प्रमाणे पाठवितांना पोस्टिंग सर्टिफिकेट हें मतपत्रिका योग्य प्रकारें पाठविल्याबद्दलचा दाखला समजण्यांत येईल व तदनंतर मतपत्रिका विलंबाने पोहोचल्याबद्दल किंवा मुळीच न पोहोचल्याबद्दल कोणताहि आक्षेप लागू राहणार नाही.

(छ) कोणाहि मतदाराजवळील मतपत्रिका खराब झाल्यामुळे दुसरी मतपत्रिका पाठविण्याबद्दल अध्यक्षास विनंती, संघकार्यालयांत मतपत्रिका भरून पाठविलेल्या व ती पोचण्यासाठी ठरलेल्या अंतिम तारखेपूर्वी आल्यास, खराब झालेली मतपत्रिका घेऊन नवी मतपत्रिका देण्याचा अधिकार अध्यक्षांस आहे. परंतु नवी पत्रिका भरून पाठविण्यास पुरेसा वेळ नसल्याबद्दल किंवा अशा प्रकारच्या अन्य कोणत्याहि तक्रारीने निवडणुकीसंबंधांत आक्षेप घेतां येणार नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(ज) नियमावलींत निवडणुकीसंबंधांतील ज्या बाबींबद्दल उपबंध नाही अशा बाबींसंबंधांतील आवश्यक तो सर्व आदेश देण्याचा अध्यक्षांस अधिकार आहे, व त्या संबंधांत कोणत्याहि प्रकारचा आक्षेप घेतां येणार नाही.

१२ (आ) निवणुकीसंबंधांत जाहीर करावयाच्या गोष्टी किंवा घोषणा ह्या केंद्रीय संघकार्यालयांतील सूचना-फलकावर योग्य सहीनिशीं लावल्याने त्यांची प्रसिद्धि नियमांनुसार झाली असें मानण्यांत येईल. इतर वृत्त-पत्रांमधून किंवा युगवाणींत प्रसिद्धि होणें हें कार्यालयाने सोय म्हणून करण्यास हरकत नाही, पण याबाबत बंधन नाही.

ठराव वाचल्यानंतर गेल्या निवडणुकीचे वेळीं आलेल्या अडचणींचा उल्लेख करून ते म्हणाले की यावेळीं तशी अडचण न येतां कार्य सुकर व्हावें म्हणून हा ठराव मांडण्यांत आला आहे.

सभाध्यक्षांनी चर्चेची परवानगी दिल्यावर ॲड्. अरविंद बोबडे यांनी ठरावावर विरोधी भाषण केलें. आपल्या भाषणांत कलमवार विवेचन करून त्यांनी ठरावाची उपयुक्तता कशी कमी पडते हें विशद केलें. संपूर्ण घटनाच कायद्याच्या दृष्टीने बदलणें आवश्यक असून एका स्वतंत्र समितीने हें कार्य हातीं घ्यावें असें म्हणून त्यांनी आपल्या आक्षेपांचा समारोप केला.

त्यानंतर श्री. म. न. अंजीकर यांनी ही सभा इतक्या घाईने असे महत्त्वाचे निर्णय घेऊं शकत नाही म्हणून खालील उपसूचना मांडली :

"घटनेंतील नियमांचें पूर्ण स्पष्टीकरण होत नाही. निवडणुकीच्या पद्धतींत व घटनेंत सर्वत्र सूत्रबद्धता येऊन अडचणी दूर होण्याचे दृष्टीने ह्या सूचना पूर्ण करून त्यांना अधिक सुस्पष्ट स्वरूप देणें आवश्यक आहे. तरी याबाबत सर्व दृष्टींनी विचार करून घटनादुरुस्तीच्या सर्व सूचना तयार करण्यासाठी खालील सदस्यांची एक समिति नेमण्यांत येत आहे—

(१) श्री. मार्तंड माधव किनखेडे-नागपूर (२) श्री. नारायण कन्हैयालाल तांबी, अमरावती (३) श्री. गोवर्धन जो. अगरवाल, नागपूर (४) श्री. ख. के. रांगोळे, नागपूर.

वरील समितीने आपला अहवाल १५ एप्रिलपर्यंत कार्यकारी मंडळास सादर करावा."

श्री. एन्. जी. जोशी यांनी सूचनेला अनुमोदन दिलें.

यावर साधकबाधक चर्चा होऊन सभाध्यक्षांनी, मूळ ठरावाची व्याप्ति वाढविणारी ही उपसूचना असल्यामुळे ती सूचना नामंजूर केली आणि ठरावावरील चर्चा बंद केली.

त्यानंतर मूळ ठरावाच्या आक्षेपांना उत्तर देतांना श्री. रांगोळे यांनी ठरावाची आवश्यकता आणि उपयुक्तता प्रतिपादन केली. त्यांनी आक्षेपक श्री. बोबडे यांच्याशीं अर्धा तास वेगळी चर्चा करून मूळ ठरावांत योग्य त्या दुरुस्त्यांबद्दल विचारविनिमय करण्याची आपली तयारी दर्शविली. तडजोड न झाल्यानें सभाध्यक्षांनी ठराव मतास टाकला आणि तो प्रचंड बहुमताने नामंजूर झाला.

ठराव २—" वरील संशोधनें मंजूर होतांच अमलांत येतील"—हा ठराव पहिल्या ठरावाच्या पुष्ट्यर्थ असल्यामुळे त्याची आवश्यकता उरली नसल्याचें सभाध्यक्षांनी सांगितलें.

नंतर ठराव ३ रा मांडण्याबद्दल सभेत बरीच साधकबाधक चर्चा होऊन सभाध्यक्षांनी तो मांडण्याची श्री. रांगोळे यांना सूचना केली.

ठराव ३—विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीची मुदत तीन वर्षांची असावी. कार्यकारिणी व कार्याध्यक्ष यांची निवडणूक दर तीन वर्षांनी व्हावी. संमेलनाचा अध्यक्ष सालोसाल संमेलनापूर्वी निवडण्यांत यावा व तो कार्यकारिणीचा पदसिद्ध सभासद रहावा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हा उद्देश साध्य करण्यासाठी घटनेंत जो बदल करणें आवश्यक असेल तत्संबंधी व तदनुषंगिक उपसूचना शक्य तितक्या लवकर तयार करून पुढील विशेष साधारण सभेपुढे विचाराकरिता मांडण्यांत यावी.

श्री. रांगोळे यांनी वरील ठराव क्र ३, वाचून दाखविला आणि आलेल्या अडचणी लक्षांत घेतां घटनेच्या संशोधनांत उपयोगी पडेल असें वाटल्यावरून हा ठराव सभेचें मत अजमावण्याच्या दृष्टीने मांडण्यांत आल्याचें त्यांनी सांगितलें.

ठरावावर बरीच उद्‌बोधक चर्चा होऊन ठराव मतास टाकण्यांत आला व तो बहुमताने नामंजूर झाला.

एकंदर चर्चेंत ॲड्. बोबडे, श्री. ना. क. तांबी, श्री. म. ना. अंजीकर, श्री. रांगोळे, श्री. दे. गो. लांडगे, श्री. श. वा. रानडे, श्री. द. शं. फडके, श्री. रा. पु. सगदेव, श्री. एन्. जो. जोशी, श्री. पु. य. देशपांडे, प्रा. के. बैतुले, ॲड्. घाटे, श्री. र. वि. कुळकर्णी, श्री. श्री. वि. गंधे, श्री. ग. सा. सहस्रबुद्धे प्रभृति सभासदांनी भाग घेतला.

कार्यक्रम पत्रिकेवरील विषय संपल्यावर आभारप्रदर्शनानंतर ही विशेष साधारण सभा संपली.

*   *

संघाध्यक्ष श्रीमान् बा. ग. ऊर्फ बाबासाहेब खापर्डे यांची भेट

सोमवार दिनांक १७-१-५५ रोजीं सायंकाळीं ८-३० वाजतां संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांनी, संघाचें अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच, कार्यालयाला भेट दिली. त्यांनी कार्यालयाची पाहणी करून एकंदर कार्याबद्दल समाधान व्यक्त केलें. याप्रसंगीं वि. सा. संघाचे विश्वस्त, पूर्वाध्यक्ष आणि कार्यकारिणीचे नागपुरांतील सदस्य उपस्थित होते. सर्वांशीं श्रीमान् बाबासाहेबांची ओळख करून देण्यांत आली.

कै. राम गणेश गडकरी स्मृतिदिन

वि. सा. संघाच्या गडकरी स्मारक समितीच्या विद्यमानें दि. २३ आणि २४ जानेवारी ५५ रोजी कै. राम गणेश गडकरी यांचा ३६ वा स्मृतिदिन समारंभ प्रा. श्रीमती शांताबाई शेळके यांच्या अध्यक्षतेखाली, वि. सा. मंदिराच्या गडकरी स्मारक सभागृहांत थाटाने साजरा करण्यांत आला.

दिनांक २३ रोजीं कै. गडकरी यांच्या प्रतिमेचें पूजन व कार्याध्यक्षांच्या अहवालवाचनानंतर अध्यक्षांचें विचारपरिप्लुत भाषण झालें.

दिनांक २४ रोजीं प्रा. श्री. मा. कुळकर्णी यांचें 'गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत' या विषयावर प्रबंधवाचन आणि श्रीमती शांताबाई शेळके यांचें 'गडकऱ्यांच्या कांही गूढरम्य कवितांचें विवेचन' या विषयावर भाषण झालें. तसेंच भावगीतगायनाचाहि कार्यक्रम आयोजित करण्यांत आला होता.

*   *

श्री. अरविंद गोखले यांची भेट

मंगळवार दि. २५-१-५५ रोजीं सकाळीं ९ वाजतां सुप्रसिद्ध लघुकथालेखक श्री. अरविंद गोखले यांनी वि. सा. संघाला भेट दिली. त्या प्रसंगीं राधा-दामोदर दालनांत त्यांचा सत्कार करण्यांत आला.

*   *

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. दादासाहेब धनवटे, यांची उदार देणगी

दातृत्वशील श्रीमंत दादासाहेब धनवटे यांनी वि. सा. संघाचे दिवंगत थोर अध्यक्ष श्री. हरिभाऊ नेने यांचें अप्रतिम छायाचित्र विदर्भ साहित्य संघाला भेट म्हणून दिलें व जाहीर केलेला आपला संकल्प पूर्ण केला. वि. सा. संघ त्यांच्या या उदार देणगीबद्दल त्यांचा ऋणी आहे.

* *

न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद यांची भेट

न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद, पुणें यांनी दि. २९-१-५५ रोजीं सायं. ६ वाजतां वि. सा. संघाला भेट दिली. त्या प्रसंगीं 'अतींद्रिय ज्ञान आणि शांति' या विषयावर त्यांनी अत्यंत विद्वत्ता-पूर्ण व्याख्यान दिलें.

* *

आचार्य अत्रे यांची गडकरी स्मारकगृहाला भेट

आचार्य अत्रे यांनी रविवार दि. ३०-१-५५ रोजीं दुपारीं ३-३० वाजतां वि. सा. संघाच्या गडकरी स्मारक गृहाला भेट दिली. आपल्या भाषणांत कै. गडकऱ्यांबद्दल आपला भक्तिभाव व्यक्त करून आचार्य अत्रे यांनी आपल्याजवळ असलेलीं कै. गडकऱ्यांचीं हस्तलिखितें गडकरी स्मारक समितीला देण्याचें आश्वासन दिलें.

* *

वि. सा. संघ, कार्यकारी मंडळाची सभा

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. ३०-१-५५ रोजीं सायं. ५ वाजतां केन्द्रीय कार्यालयांत संघाध्यक्ष श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली भरली.

संघाध्यक्ष श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी अध्यक्षस्थान ग्रहण केल्यावर सभेच्या कामकाजास रीतसर सुरुवात झाली.

(१) प्रथम सरचिटणिसाने दि. २-१-५५ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

(२) त्यानंतर उपाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी सध्याच्या अडचणी लक्षांत घेऊन संमेलन पुढे ढकलण्यासंबंधी कारणमीमांसा सादर केली आणि कार्यकारी मंडळाच्या स्थानिक सभासदां [illegible] ने हें संमेलन फेब्रुवारीच्या दि. १९ व २० या तारखांना भरविण्याचें सुचविलें असें सभेल [illegible] केलें. त्यावर विचार होऊन, संमेलन फेब्रुवारीच्या १९ व २० या तारखांना भरविण्यात यावें अ[illegible] एकमताने ठरलें. तसेंच घटना नियम १९ (इ) प्रमाणे संमेलनाकरिता २५० रु. च्या खर्चास मंजुरी देण्यांत येऊन, आवश्यकतेनुसार ५० रु. अधिक खर्च करण्याचा संघाध्यक्षांना अधिकार राहील असेंहि ठरलें.

(३) श्री. रामचरण भंगी याच्या अर्जाचा विचार करण्यात येऊन, त्याला मासिक १॥ रु. ऐवजीं २ रु. पगार देण्याचें ठरल्यावर ही सभा संपली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भंडारा शाखा वृत्त

दुखवट्याची सभा

संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांच्या आकस्मिक निधनानिमित्त दि. २३ नोव्हेंबर ५४ रोजीं सार्वजनिक वाचनालयांत दुखवट्याची सभा घेण्यांत येऊन श्रद्धांजलि अर्पण करण्यांत आली.

श्री. य. रा. दाते यांचें भाषण

दि. ५ नि ंबर ५४ रोजीं आदर्श चित्रमंदिरांत ज्ञानकोशाचे संपादक, शब्दकोशकार श्री. य. रा. दाते यांचें शेयांतील सामाजिक जीवन व शिक्षण' या विषयावर अत्यंत माहितीपूर्ण व्याख्यान झालें. याप्रसंगीं रशियन पेहराव सर्वांना दाखविण्यांत आला. तसेंच सार्वजनिक वाचनालयांत, चित्रें, छायाचित्रें, ग्रंथ आणि रशियन वस्तूंचें एक छोटेसें पण नाविन्यपूर्ण प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें.

उपमंत्री श्री. ना. खं. तिरपुडे यांचा सत्कार

वि. सा. संघ, भंडाराशाखेच्या कार्यकारी मंडळातर्फे दि. १३ डिसें. ५४ रोजीं भंडारा शाखा कार्यकारी मंडळाचे सदस्य आणि वि. सा. कार्यकारी मंडळाचे माजी सदस्य श्री. ना. खं. उर्फ बाळासाहेब तिरपुडे, उपमंत्री, म. प्र. यांचा थाटाने सत्कार करण्यांत आला.

श्री. गोपीनाथ तळवलकर यांचें व्याख्यान

दि. २१ डिसें. ५४ रोजीं सायंकाळीं 'आनंद' मासिकाचे संपादक, श्री. गोपीनाथ तळवलकर यांचें गांधीभवनांत व्याख्यान झालें. व्याख्यानाचा विषय 'वाङ्मय व रसास्वाद' हा होता.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

विदर्भ साहित्य संमेलन : १७ वें अधिवेशन

दिनांक १९ व २० फेब्रु. ५५ ला भरणार

विदर्भ साहित्य संमेलनाचें येतें अधिवेशन अचलपुरास भरण्याचें वेळेवर रहित झाल्यामुळे कार्यकारी मंडळानें हें १७ वें अधिवेशन नागपुरास दि. ५ व ६ फेब्रु. स भरविण्याचें प्रथम ठरविलें होतें. परंतु वेळेच्या अभावामुळे संमेलनाची व्यवस्था होऊं शकली नाही. म्हणून कार्यकारी मंडळाच्या संमतीनें या तारखा पुढे ढकलण्यांत येऊन त्या दि. १९ व २० फेब्रु. रोजीं निश्चित केल्या आहेत. आता वरील तारखांस संमेलनाचें हें अधिवेशन नागपुरास होईल. तरी संमेलनासाठी ज्यांना कोणाला ठराव पाठवावयाचे असतील, त्यांनी संमेलनाच्या तारखेपूर्वी १४ दिवस अगोदर ते कार्यालयांत पोचतील अशा बेतानें पाठवावे, अशी विनंती आहे.

संमेलनासाठी बाहेरगावाहून येणाऱ्या ज्या प्रतिनिधींना राहण्याची सोय करून हवी असेल त्यांनी दि. १० फेब्रु. पूर्वी कार्यालयांत कळवावें म्हणजे त्यांची राहण्याची व जेवण्याची सोय करण्यांत येईल. त्यासाठी निराळा आकार पडेल.

संमेलनास वि. सा. संघाच्या सर्व सदस्यांना प्रतिनिधि म्हणून उपस्थित राहतां येतें त्यासाठी निराळा आकार पडणार नाही.

संघाच्या नागपूरच्या सदस्यांनी व संघप्रेमी जनतेनें प्रत्येकीं किमान ५ रु. देणगी देऊन संमेलन भरविण्यास सहाय्य करावें अशी विनंती आहे. अशा देणगीदारांस संमेलनप्रसंगीं संघाच्या सांस्कृतिक समितीतर्फे होणाऱ्या नाटयादि मनोरंजक कार्यक्रमांस विनामूल्य उपस्थित राहतां येईल.

नागपूर
दि. ३०-१-५५

सरचिटणीस
वि. सा. संघ, नागपूर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Regd. N

विदर्भ साहित्य संघ, परीक्षा समिति, नागपूर

परीक्षक सूचा

पुढील परीक्षकांनी जानेवारी ५५ मध्ये झालेल्या वि. सा. संघाच्या परीक्षा घेण्यांत समितीला केवळ सेवाभावाने जें अमोल साह्य केलें, त्याबद्दल संस्था त्यांची अत्यंत ऋणी आहे.

प्राश्निक व परीक्षक

१. मराठी प्रवेश:-श्री. वा. म. बोधनकर, प्राचार्य डिप्. टी. इन्स्टिटयूट फॉर मेन, अमरावती
२. मराठी प्रारंभ:—श्री. द. कृ. मोहनी, नागपूर
३. साहित्य विनीत:—श्री. पद्माकर निमदेव, बी. ए. बी. टी., अमरावती
४. साहित्य परिचित१–सौ. प्रा. सुधाताई साठे, एम. ए., नागपूर.
५. साहित्य परिचित२–प्रा. कृ. व्यं. पेशकार, एम. ए. (संस्कृत, मराठी) बी. टी., विशारद, अमरावती
६. साहित्य स्नातक१–प्रा. डॉ. शं. गो. वाळिंबे, एम. ए., इंदूर
७. साहित्य स्नातक२–प्रा. डॉ. शं. गो. तुळपुळे, एम. ए., पीएच. डी., पुणें
८. साहित्य स्नातक३–प्रा. डॉ. मा. गो. देशमुख, एम. ए., पीएच. डी., नागपूर
९. साहित्य पारंगत१–प्रा. श्री. म. माटे, एम. ए., पुणें
१०. साहित्य पारंगत२–प्रा. श्री. के. क्षीरसागर, पुणें
११. साहित्य पारंगत३–प्राचार्य श्री. ल. पांढरीपांडे, एम. ए. (संस्कृत,मराठी), नागपूर
१२. साहित्य पारंगत४–प्रा. पां. कृ. सावळापूरकर, नागपूर
१३. साहित्य पारंगत५–प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, एम. ए. (संस्कृत), अमरावती.

मराठी प्रारंभ–सहायक परीक्षक

१. श्री. रा. पु. सगदेव, एम. ए., एलएल. बी., नागपूर
२. श्री. स. ना. कुळकर्णी, बी. ए., एल. टी., नागपूर
३. सौ. विमलाताई मुंजे, एम. ए., नागपूर
४. श्री. व. कृ. वऱ्हाडपांडे, एम. ए., नागपूर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य विनीत परीक्षक

१. श्री. शं. गो. सहस्त्रबुद्धे, एम. ए., एम. ओ. एल., नागपूर
२. प्रा. गो. मो. रानडे, एम. ए., जबलपूर
३. श्रीमती शकुंतळाबाई दिवाणजी, एम. ए., बी. टी., अमरावती
४. श्री. गो. बा. पुल्लीवार, बी. ए., बी. टी., चांदा
५. श्री. वा. कृ. देव, बी. ए., नागपूर
६. सौ. उषाताई नागले, एम. ए., बी. टी., नागपूर
७. श्री. कृ. मा. चवरे, एम. ए., बी. टी., नागपूर
८. प्रा. प्र. गो. सहस्त्रबुद्धे, एम. ए., एलएल. बी., खामगांव
९. श्री. गो. मो. कोलते, बी. ए., बी. टी., वर्धा
१०. श्री. तु. ना. काटकर, साहित्य पारंगत, चांदा
११. श्री. भा. पुं. भाकलेकर, साहित्य पारंगत, उभादांडा, वेंगुर्लें.

तौलनिक प्रगतिपट

क्रमांक	सन	पारंगत	स्नातक	परिचित	विनीत	प्रारंभ	प्रवेश	ए. विद्यार्थी	केंद्रें
१	आगस्ट १९५२	६	१५	४५	२००	८८	१०	३६४	१५
२	ऑगस्ट १९५३	२	३२	५१	३३४	११५	२१	५५५	३६
३	ऑगस्ट १९५४	—	६५	६३	५९०	२३०	९२	१०४०	४२
४	जानेवारी १९५५	९	४२	११८	६७९	४५१	१३०	१४३०	४७

कांही ठळक सुधारणा—(१) कांही केंद्रांना कांही पुस्तकांचें अनुदान.

(२) निरीक्षकांना मानद्रव्य आणि परीक्षक मानद्रव्यांत वाढ.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

केंद्र–विवरण

क्रमांक	केंद्राधिकारी	केंद्र
१.	श्री. संचालक, भाषाविभाग, म. प्र.,	नागपूर १
२.	श्री. पां. स. नानोटी, बी. ए., बी. टी., पब्लिक हायस्कूल,	उमरेड
३.	श्री. त्र्यं. बा. संत, मुख्याध्यापक, से. ब. विद्यालय,	तेल्हारा
४.	श्री. प्रधानाध्यापक, सरकारी हायस्कूल,	मोर्शी
५.	श्री. य. के. शेकदार, प्रधानाध्यापक, के. ई. एस्. हायस्कूल,	पांढरकवडा
६.	श्री. प्रधानाध्यापक, कोषटवार हायस्कूल,	पुसद
७.	श्री. प्रधानाध्यापक, स. सि. बेसिक शाळा,	नागभीड
८.	श्री. बा. का. देशमुख, वकील,	गोंदिया
९.	श्री. पं. गो. कुंभारे, म. म. विद्यालय,	देसाईगंज
१०.	श्री. प्रधानाध्यापक, श्री गुरुदेव विद्यामंदिर, (गुरुकुंज),	मोझरी
११.	श्री. गो. आ. भांडारी, वकील,	साकोली
१२.	श्री. म. ता. राजूरकर, विशारद, न. मा. प्रा. मराठी शाळा,	वणी
१३.	श्री. वा. प्र. पाटील, एम्. एस्सी., बी. टी., अधीक्षक, नॉर्मलस्कूल,	डोंगरगाव
१४.	श्री. म. र. बनपूरकर, नेवजाबाई हितकरणी हायस्कूल,	ब्रह्मपुरी
१५.	श्री. प. गो. लाखणीकर, मुख्याध्यापक, समर्थ विद्यालय,	लाखणी
१६.	श्री. वा. स. पानट; एम्. ई. एस्. हायस्कूल,	मलकापूर
१७.	श्री. श्री. पुं. कठाळे, से. फ. ला. हायस्कूल,	धामणगाव रेल्वे
१८.	श्री. द. शं. फडके, बी. ए., बी. टी., मुख्याध्यापक, न्यू हायस्कूल,	अमरावती
१९.	श्री. मा. बा. भुते, मराठी मिडलस्कूल,	गिरड
२०.	श्री. म. स. संगई, सीताबाई संगई हायस्कूल,	अंजनगांव
२१.	श्री. ब. पं. तांदळे, रामनगर,	वर्धा
२२.	श्री. कृ. आ. पाठक, एडेड हायस्कूल,	दारव्हा
२३.	श्री. मुख्याध्यापक, राजेश्वर हायस्कूल,	बडनेरा
२४.	श्री. मुख्याध्यापक, मॉडेल हायस्कूल,	आर्वी
२५.	श्री. मा. शि. देशमुख, जनता विद्यालय,	मालेगाव
२६.	श्री. मुख्याध्यापक, नांदूरा हायस्कूल,	नांदूरा
२७.	श्री. तु. ना. काटकर, साहित्य पारंगत, न्यू इंग्लीश हायस्कूल,	चांदा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

क्रमांक	केंद्राधिकारी	केंद्र
२८.	श्री. गु. वि. पोटे, शिवाजी हायस्कूल,	तेल्हारा
२९.	श्री. म. शं. बन्सोड, श्रीराम विद्यालय,	रामटेक
३०.	श्री. दि. का. काटे, एम. ए., मुख्याध्यापक, जनता विद्यालय,	नेरपिंगळाई
३१.	श्री. ता. सी. पाटील, मुख्याध्यापक, लोकजीवन विद्यालय,	बेला
३२.	श्री. प्रधानाध्यापक, शिवाजी हायस्कूल,	आकोट
३३.	श्री. प्रधानाध्यापक, मन्रो हायस्कूल,	भंडारा
३४.	श्री. त्र्यं. ना. मुळे, सरकारी माध्यमिक शाळा,	चिखली
३५.	श्री. मो. वि. फुरसुले, कंकुबाई विद्यालय,	कारंजा
३६.	श्री. रा. वि. करपे, मोहता विद्यालय,	हिंगणघाट
३७.	प्रा. श्री. मा. कुळकर्णी, भारतीय भाषाध्ययन मंदिर,	नागपूर २
३८.	श्री. संचालक, राष्ट्रभाषा प्रचार समिति, (धंतोली),	नागपूर ३
३९.	श्री. त्रि. बा. जोग, प्रधानाध्यापक, ना. मा. चौधरी हायस्कूल,	आकोला
४०.	श्री. शं. य. मेलग, अवधुतवाडी,	यवतमाळ
४१.	श्रीमती रत्नप्रभाबाई घारपुरे, एम्. ए., बी. टी., मुलींचें सरकारी हायस्कूल,	खामगांव
४२.	श्री. बी. व्ही. देशमुख, बी. ए., बी. टी., मुख्याध्यापक, जनपद हायस्कूल,	पातुर्डा
४३.	प्रा. गो. मो. रानडे, महिला महाविद्यालय,	जबलपूर
४४.	श्री. मुख्याध्यापक, दादा भामोदकर पूर्व माध्यमिक शाळा	साऊर
४५.	श्री. मांजरेकर, पूर्व प्राथमिक मराठी शाळा, क्र. ३,	उभादांडा (वेंगुर्ले)
४६.	श्री. श्री. ज. महाजन, गव्ह. आय्. ई. एम्. स्कूल,	कामठी
४७.	श्री. भा. पुं. चांदूरकर, सा. स्नातक,	बेलज

पां. कृ. सावळापूरकर,
संचालक

माणिक के. बैतुले,
कार्यवाह

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugwani) Regd. No. N 9

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीनें स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीनें दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन.

५. मराठी भाषेच्या हितांचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनानें विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ✱ **सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये**

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे उपाध्यक्ष, वि सा. संघ यांनी नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ